रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २३९
www.ramprahar.com
सोमवार, १७ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

खालापुरात तणावानंतरही भाईचारा कायम/२
पेण पोलिसांच्या नाकाबंदीत हजारोंचा गांजा जप्त/५
सध्या तरी निवृत्तीचा विचार नाही -विराट/८

## हर्षवर्धन सपकाळांचे वादग्रस्त विधान; भाजपकडून निषेध



**रत्नागिरी :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची थेट औरंगजेबाशी तुलना करणारे वादग्रस्त विधान केले आहे. 'औरंगजेब क्रूर शासक होता, आज देवेंद्र फडणवीसही तेवढेच क्रूर आहेत,' असे सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले. त्यांच्या या विधानानंतर भाजप नेत्यांकडून सपकाळ यांचा समाचार घेतला जात आहे. अनेकांनी त्यांचा निषेधही केला. दरम्यान, या संदर्भात बोलताना भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी, प्रदेशाध्यक्ष म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांना कोण ओळखत नाही. त्यांचे वक्तव्य अत्यंत मुर्खपणाचे आहे. प्रशासक म्हणून देवेंद्र फडणवीस काय आहेत हे महाराष्ट्राला माहीत आहे. असे असताना ज्यांच्या रक्तात औरंगजेबी वृत्ती भिनली आहे ते काँग्रेसवाले महाराष्ट्रातून नेस्तनाबूत झाल्यानंतर आलेल्या वैफल्यातून वाटेल ते बरळत आहेत, असा पलटवार केला.

# आरएसएसने संस्कार अन् दिशा दिली

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली कृतज्ञता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि प्रसिद्ध अमेरिकन पॉडकास्टर लेक्स फ्रीडमन यांच्यातील पॉडकास्ट रविवारी (दि. १६) रिलीज करण्यात आली. या पॉडकास्टमध्ये पंतप्रधान मोदींनी विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची भूमिका, त्यांचे समाजातील योगदान आणि वैयक्तिक अनुभव याबद्दल माहिती दिली.



लेक्सने फ्रीडमन यांनी प्रश्न विचारला की, तुम्ही आठ वर्षांचे असताना हिंदू राष्ट्रवादाच्या कल्पनेला पाठिंबा देणाऱ्या आरएसएसमध्ये सहभागी झाला होता. याबद्दल काय सांगाल? संघटनेचा तुमच्यावर आणि तुमच्या राजकीय विचारांच्या विकासावर काय परिणाम झाला? पीएम मोदी म्हणाले की, आमच्या गावात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा होती. तिथे देशभक्तीपर गाणी वाजवली जायची. त्या गाण्यांमधील काही गोष्टी मला खूप स्पर्शून गेल्या आणि अशा प्रकारे मी आरएसएसचा भाग झालो. आरएसएसमध्ये आम्हाला दिलेल्या मूलभूत मूल्यांपैकी एक म्हणजे तुम्ही जे काही कराल ते एका उद्देशाने करा, राष्ट्रासाठी योगदान देण्यासाठी करा. उदाहरणार्थ, मी अभ्यास केला तर मी इतका अभ्यास केला पाहिजे की, तो देशासाठी उपयुक्त ठरावा. मी व्यायाम केला, तर इतका व्यायाम केला पाहिजे माझे शरीरही देशासाठी उपयुक्त ठरावे. हेच संघवाले शिकवतात. संघ ही खूप मोठी संघटना आहे. आता संघाचा १००वा वर्धापन दिन जवळ आला आहे. एवढी मोठी स्वयंसेवी संस्था कदाचित जगात कुठेही अस्तित्वात नाही. संघाशी कोट्यवधी लोक जोडले गेले आहेत, पण संघाला समजून घेणे इतके सोपे नाही. त्याच्या कार्याचे स्वरूप खरोखर समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कोणत्याही गोष्टीपेक्षा संघ तुम्हाला एक स्पष्ट दिशा प्रदान करतो ज्याला खरोखर जीवनाचा एक उद्देश म्हणता येईल.

दुसरे म्हणजे देश सर्वस्व आहे आणि जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे हे वैदिक काळापासून सांगितले जाते. हेच आपल्या ऋषीमुनींनी सांगितले आहे, हेच विवेकानंदांनी सांगितले आहे आणि हेच संघाचे लोक म्हणतात. संघाकडून मिळालेली प्रेरणा घेऊन तुम्ही समाजासाठी काहीतरी करा, असे स्वयंसेवक सांगतात आणि त्याच भावनेने प्रेरित होऊन आज अनेक उपक्रम सुरू आहेत. उदाहरणार्थ, काही स्वयंसेवकांनी सेवा भारती नावाची संस्था स्थापन केली. ही संस्था झोपडपट्ट्या आणि वस्त्यांमध्ये राहणाऱ्या गरीब लोकांना सेवा देते. यालाच ते सेवा समाज म्हणतात. माझ्या माहितीनुसार ते जवळपास एक लाख २५ हजार सेवा प्रकल्प कोणत्याही सरकारी मदतीशिवाय आणि केवळ समुदायाच्या पाठिंब्याने चालवतात. ते तिथे वेळ घालवतात, मुलांना शिकवतात, त्यांच्या आरोग्याची काळजी घेतात, चांगले संस्कार देतात आणि या समुदायांमध्ये स्वच्छता सुधारण्यासाठी कामे करतात. ही काही छोटी उपलब्धी नाही.

आमच्याकडे भारतीय मजदूर संघ आहे. त्याच्या सुमारे ५० हजार युनियन आहेत, ज्यांचे देशभरात लाखो सदस्य आहेत. कदाचित प्रमाणाच्या बाबतीत जगात यापेक्षा मोठी कामगार संघटना नाही, पण ते कोणत्या प्रकारचा दृष्टिकोन स्वीकारतात ही मनोरंजक गोष्ट आहे. ऐतिहासिकदृष्ट्या डाव्या विचारसरणीने जगभरातील कामगार चळवळीला चालना दिली. त्यांची घोषणा काय आहे? 'जगातील कामगारांनो, एक व्हा.' आरएसएस प्रशिक्षित स्वयंसेवकांनी चालवलेल्या कामगार संघटना कशावर विश्वास ठेवतात? ते म्हणतात, कामगारांनी जग एकत्र केले आहे. इतर म्हणतात, 'जगातील कामगार एक व्हा' आणि आम्ही म्हणतो, 'कामगारांनी जग एकत्र केले आहे.' हा शब्दातला एक छोटासा बदल वाटत असला तरी हा एक प्रचंड वैचारिक बदल आहे. आरएसएसमधून येणारे स्वयंसेवक अशा उपक्रमांना बळ देतात आणि प्रोत्साहन देतात. जेव्हा तुम्ही या उपक्रमांवर नजर टाकाल तेव्हा तुम्हाला दिसेल की गेल्या १०० वर्षात आरएसएसने भारताच्या चकाचकतेपासून दूर राहून साधकाप्रमाणे समर्पणाने काम केले आहे. अशा पवित्र संस्थेतून मला जीवनमूल्ये आणि संस्कार मिळाले हे माझे भाग्य आहे, अशी भावना पीएम मोदींनी या वेळी व्यक्त केली.

### ३० मार्चला नागपूर दौरा

**नागपूर :** येत्या ३० मार्च रोजी अर्थात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नागपुरात माधव नेत्रालयाच्या नवीन इमारतीचे हिंगण्यात भूमिपूजन होणार आहे. आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची त्याच दिवशी जयंती आहे. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक डॉ. मोहन भागवत एका व्यासपीठावर येणार आहेत. या वेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आचार्य गोविंद गिरी महाराज, अवधेशानंद गिरी महाराज यांची प्रामुख्याने उपस्थिती असणार आहे.

# अवयवदान श्रेष्ठ दान!

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन; नवीन पनवेलमध्ये जनजागृती अभियान




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अवयवदान हे श्रेष्ठ दान आहे. त्यामुळे मरावे परी अवयवरूपी उरावे या भावनेतून आपण संकल्पबद्ध व्हा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेलमध्ये अवयवदान अभियानावेळी केले.

जीवनविद्या मिशन ज्ञानसाधना केंद्र आणि स्वानंदयोग साधना केंद्राच्या वतीने अवयवदान अभियान आणि मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी (दि. १६) नवीन पनवेल सेक्टर १९मधील श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालयात करण्यात आले होते. अवयवदानाच्या जनजागृतीसाठी जीवनविद्या मिशन, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग आणि विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीच्या समन्वयाने हे अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत हृदय, यकृत, फुफ्फुस, मूत्रपिंड, स्वादुपिंड, आतडी, डोळे, त्वचा, हृदयाच्या झडपा आणि कानाचे पडदे अशा अवयवांचे दान करता येते.

नवीन पनवेलमध्ये झालेल्या या अभियानात ६५हून अधिक जागृत नागरिकांनी अवयवादानाचे संमतीपत्र सादर केले. या वेळी प्रसिद्ध पॅथॉलॉजी डॉ. आरती मलिक, डॉ. मकरंद निकुंभ, स्वानंदयोग साधना केंद्र पनवेलचे अध्यक्ष भारत नागे, सचिव किरण वाणी, खजिनदार भालचंद्र देसाई, कार्याध्यक्ष अरुण नाईक आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी अवयवदानापेक्षा दुसरे कोणते पुण्याचे काम हे समाजामध्ये असू शकत नाही, असे सांगून तुकाराम बीजच्या पवित्र दिनी आयोजित या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले.

दरम्यान, या कार्यक्रमापूर्वी अवयवदानाविषयी जनजागृती करण्यासाठी नवीन पनवेल परिसरात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



## निवडक

### बलुच आर्मीचा पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर मोठा हल्ला

**नोशकी :** पाकिस्तानला जेरीस आणणाऱ्या बलुच आर्मीने पुन्हा एकदा तगडा वार केला आहे. बलुचिस्तान प्रांतातील नोशकी जिल्ह्यात बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्याला लक्ष्य केले. पाकिस्तानी सैन्याच्या सूत्रांनी दिलेल्या वृत्तानुसार यात सात सैनिकांचा मृत्यू झाला असून २१ जण जखमी झाले आहेत, तर बीएलएने ९० पाकिस्तानी सैनिकांना ठार मारल्याचा दावा केला आहे.

### नाईट क्लबमध्ये भीषण आग; ५० जणांचा होरपळून अंत

**कोकानी :** युरोपात उत्तर मॅसेडोनिया देशामध्ये कोकानी शहरातील पल्स नाईट क्लबमध्ये रविवारी (दि. १६) पहाटे लागलेल्या भीषण आगीत किमान ५० जणांचा मृत्यू झाला आहे. कार्यक्रमादरम्यान आतषबाजीमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. कार्यक्रमाला सुमारे १,५०० लोक उपस्थित होते. आगीच्या भीषण दुर्घटनेत ५० जणांचा मृत्यू झाला असून अनेक जखमी झाले आहेत.

# महाड येथील मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या कामाची आमदार प्रवीण दरेकरांकडून पाहणी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार भूमिपूजन

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील केंबुर्ली येथे विधान परिषदेतील भाजपचे गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रयत्नाने मल्टीस्पेशालिटी रुग्णालय साकारणार आहे. या कामाची आमदार दरेकर यांनी शनिवारी (दि. १५) पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या रुग्णालयाचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती आमदार दरेकर यांनी या वेळी दिली.

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणपासून रायगड जिल्ह्यातील रोह्यापर्यंत एकही सुसज्ज असे शासकीय मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नाही. या पार्श्वभूमीवर आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रयत्नातून महाडमध्ये २०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय होत आहे. केंबुर्ली येथे महामार्गालगत जवळपास ६.५ हेक्टरमध्ये १४७.७ कोटी खर्च करून हे रुग्णालय होत आहे. आमदार दरेकर यांनी शनिवारी या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली.



या पाहणी दौऱ्यावेळी भाजप जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, संदीप ठोंबरे, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता महेश नामदे, उपअभियंता तुकाराम सणालकर उपस्थित होते.

या रुग्णालयात सर्व प्रकारचे उपचार, शस्त्रक्रिया होणार आहेत. १९,८३० चौरस मीटर एवढ्या भव्य स्वरूपाची पाच मजली मुख्य इमारत होणार असून दोन्ही बाजूने सात मिटरचे रस्ते असणार आहेत. कालांतराने या ठिकाणी आपण वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार असल्याचा मानस आमदार दरेकर यांनी या वेळी बोलून दाखविला तसेच रुग्णालयासाठी व पंचक्रोशीतील गावांना उपयोगी पडेल अशी पाणी योजनादेखील मंजूर करणार असल्याचे सांगितले.

# पोलादपूरमध्ये बसच्या धडकेत दुचाकीस्वार दोन तरुणांचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

खासगी बसची धडक बसून दुचाकीस्वार आणि त्याच्या मागील सीटवर बसलेल्या तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना पोलादपूर तालुक्यातील ओंबळी येथे रविवारी (दि. १६) सकाळी घडली. राहुल श्रीरंग साळुंखे (वय २७) आणि सिद्धेश गणेश सकपाळ (वय २३, दोघेही रा. ओंबळी) अशी मृत तरुणांची नावे आहेत.

ओंबळी येथे रात्री उशिरापर्यंत शिमग्याचे कार्यक्रम सुरू असल्याने मंदिरात प्रकाशव्यवस्था चालू होती. मंदिराच्या लाईट बंद करण्यासाठी राहुल आणि सिद्धेश हे दोन तरुण रविवारी सकाळी पावणेसातच्या सुमारास गावातून मोटरसायकल (एमएच ०४ केएन ८२२१)वरून चालले होते. तीव्र वळणावर



त्यांची दुचाकी आणि समोरून येणारी सुजाता खासगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसची (एमएच ०४ एलवाय ९१९९) ठोकर झाली. जखमी दोन्ही तरुणांना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये आणले असता तेथे मृत घोषित करण्यात आले. या अपघातप्रकरणी बसचालक प्रेमचंद महात्ता चौधरी (वय ५०, रा. ऐरोली, नवी मुंबई) याच्याविरोधात पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, मयत दोघेही तरुण ओंबळी गावचे रहिवासी असल्याने गावावर शोककळा पसरली आहे.





**पनवेल : संत तुकाराम बीज रविवारी उत्साहात साजरी झाली. यानिमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोपर येथील मंदिरात संत तुकाराम महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, माजी उपसरपंच विजय घरत, माजी नगरसेविका सुशीला घरत, वसंतशेठ पाटील, अनंतशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, भार्गव ठाकूर, सुधीर ठाकूर, वैभव घरत, किशोर पाटील, कमलाकर घरत, सुनील पाटील, साईचरण म्हात्रे, जगदीश घरत यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.**

# माणगावमध्ये कार पेटली; मौल्यवान वस्तू बेचिराख

**माणगाव : प्रतिनिधी**

दिघी ते मुळशी मार्गावर प्रवास करीत असलेल्या पर्यटकांच्या जग्वार कारने अचानक पेट घेतल्याची घटना रविवारी (दि. १६) दुपारी माणगाव तालुक्यातील चांदोरी गावच्या हद्दीत घडली. सुदैवाने गाडीत प्रवास करणाऱ्या पाचही पर्यटकांना वेळेत बाहेर पडता आले. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र गाडीतील महत्त्वाचे सामान, लॅपटॉप, मोबाईल आणि इतर मौल्यवान वस्तू आगीत जळून खाक झाल्या आहेत.



सुनील पवार (रा. ताथोडे, मुळशी, पुणे) हे पत्नी व तीन मुलींसह कारने (एमएच १४ ईएम २४००) प्रवास करीत असताना चांदोरेजवळ अचानक या कारमधून धूर येऊ लागला व ती पेटली. इतर प्रवासी तसेच परिसरातील नागरिकांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले तसेच स्थानिकांच्या मदतीने पाण्याचा टँकर बोलवून आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

# विधान परिषद पोटनिवडणुकीसाठी भाजपचे तीन उमेदवार जाहीर



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा सोमवारी (दि. १७) अखेरचा दिवस आहे. तत्पूर्वी भाजपने महायुतीमध्ये त्यांच्या वाट्याला आलेल्या तीन उमेदवारांची घोषणा केली. यामध्ये संदीप जोशी, संजय केनेकर व दादाराव केचे यांचा समावेश आहे.

विधान परिषदेवरील पाच आमदारांची विधानसभेवर निवड झाल्याने रिक्त झालेल्या या पाच जागांसाठी २७ मार्च रोजी पोटनिवडणूक होणार आहे. भाजपला तीन, तर शिवसेना आणि राष्ट्रवादीला प्रत्येकी एक जागा मिळाली आहे.

भाजपचे प्रवीण दटके, रमेश कराड, गोपीचंद पडाळकर, राष्ट्रवादीचे राजेश विटेकर आणि शिवसेनेचे आमश्या पाडवी या विधान परिषदेच्या पाच आमदारांची विधानसभेवर निवड झाली आहे. त्यामुळे रिक्त झालेल्या पाच जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीकडून झिशान सिद्दीकी, संजय दौंड आणि उमेश पाटील यांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी कागदपत्रे तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. या तिघांपैकी एकाला विधान परिषदेवर संधी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून विधान परिषदेच्या एकमेव जागेसाठी चंद्रकांत रघुवंशी यांना संधी दिली जाईल, अशी चर्चा आहे. रघुवंशी हे शिवसेनेचे धुळे-नंदुरबारचे संपर्क प्रमुख आणि माजी विधान परिषद सदस्य आहेत.

# श्रमिकांच्या कलेला घामाचा सुगंध असतो!

## सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. शेलार यांचे प्रतिपादन

**ठाणे : प्रतिनिधी**

श्रमिकांची कला वृद्धींगत झाली होऊन पुढील पिढीपर्यंत नेली पाहिजे. आज जीपीटीचा जमाना आहे. त्यात कृत्रिम ट्यून मिळते पण सृजनाची ट्यून श्रमिक कलावंतच बनवू शकतो. या श्रमिकांच्या कलेला घामाचा सुगंध असतो,असे गौरव उद्गार राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अँड. आशिष शेलार यांनी केले.



महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल कलांचा श्रमिकांचा दोन दिवसांचा कला महोत्सव महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्यविभाग यांच्यावतीने ठाणे येथील हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनात आयोजित करण्यात आला आहे.या कला महोत्सवाचे उद्धाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अँड. आशिष शेलार यांच्या हस्ते झाले.

त्यावेळी मंत्री शेलार म्हणाले की,लुप्त होत चाललेल्या लोककलांना पुनरुज्जीवन करणे , अन्य कलांना मानाचे स्थान देणे, देशासमोर आपले राज्य संपन्न म्हणून समोर ठेवणे या उद्देशाने सांस्कृतिक विभाग प्रामाणिकपणे काम करत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या सरकार मध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालय विभागाची जबाबदारी मला दिली आहे. गेल्या ८० ते ८५ दिवसात या विभागाच्या माध्यमातून आम्ही १७० कार्यक्रम केले. संस्कृती संवर्धनाचे, प्रचाराचे ,प्रसाराचे, कलावंतांना संधी आणि स्थान देण्याचे काम या कार्यक्रमातून करत आहोत . आगामी आर्थिक वर्षात ३६५ दिवसात बाराशे कार्यक्रमांची रचना केली असल्याची माहिती शेलार यांनी यावेळी बोलताना दिली.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून संगीत ,नाटक, लोककला लोकवाद्य ,कार्यशाळा अशा विविध कार्यक्रमातून संपन्न महाराष्ट्र राज्याचे दर्शन देशात सातत्याने होत असते. आज ठाण्यात होणारा श्रमिकांचा कला महोत्सव हा विशेष आहे. श्रमिकांच्या कलाकृतीला उपजत गुणी वृत्तीला श्रमिकाच्या कामांची ,मेहनतीची जोड आहे ,म्हणून या कार्यक्रमाचा सुगंध वेगळा आहे. विदेशातील कित्येक डॉलर खर्च केले तरी श्रमिक कलावंतांची कला निर्माण होऊ शकत नसल्याचे शेलार म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर खासदार नरेश म्हस्के, भाजपा ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, संदीप लेले, सांस्कृतिक विभागाचे सहसंचालक श्रीराम पांडे, समर्थ भारत व्यासपीठाचे संचालक सुरेंद्र वैद्य, उल्हास कार्ले, मुख्य कार्यकारी अधिकारी भटू सावंत आदी उपस्थित होते. यावेळी श्रमिक व श्रमिकांच्या कलाविकासासाठी योगदान देणाऱ्या ६ गुणीजन यांचे शेलार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# बस अपघातग्रस्त जखमींची आमदार दरेकरांकडून विचारपूस

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील वरंधाघाट बस अपघातामध्ये जखमी झालेल्या व बालबाल बचावलेल्या जखमींची विधान परिषदेचे भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी महाड रुग्णालयात जाऊन आस्थेनं चौकशी करुन डॉक्टरांना योग्य ते उपचार करण्याच्या सुचना दिल्या. तसेच प्रवाशांचे प्राण वाचविणार्या चालकाचे कौतुक करुन धिर दिला.



महाड तालुक्यातील वरंधघाटातून महाडकडे येणारी रामदास पठार महाड या बसचे ब्रेक निकामी झाल्याने अपघात झाला. या अपघातात चालकाने प्रसंगावधान राखून बस मधील प्रवाशांचा जीव वाचवला आणि हजारो फुट दरीत कोसळणारी बस मार्गावरुन विरुद्ध बाजूला उतरुन मोठा धोका टाळला. मात्र तरीदेखील बस जवळपास दिडशे फुट खाली जाऊन पलटी झाली. यात महाडमधील आठरा प्रवासी जखमी झाले.

महाड येथे गावाला पालखीसाठी आलेले विधानपरिषदेचे भाजपा गट नेते आमदार प्रविण दरेकर यांना ही वार्ता समजताच त्यांनी महाड ट्रामाकेअर हॉस्पिटलमध्ये भेट देऊन जखमींची विचारपूस करुन धिर दिला. तसेच प्रवाशांसाठी देवदूत ठरलेला बस चालक हनुमंत डिघे यांना धन्यवाद देऊन त्यांचे कौतुक केले. दरम्यान दरेकर यांनी वैद्यकीय अधिक्षक डॉ शंतनु डोईफोडे यांना जखमींवर योग्य ते उपचार करा व काहीही मदत लागल्यास मला कळवा मी सर्वोतोपरी सहकार्य करेन असे अभिवचन दिले. या प्रसंगी भाजपा जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर सह भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्राचार्य आर.डी. गायकवाड यांना साश्रुपूर्ण कृतज्ञतेसह श्रद्धांजली

**सातारा : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेतील छत्रपती शिवाजी कॉलेजचे विद्यार्थी ते प्राध्यापक, प्राचार्य, सचिव, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, रयत सेवक संघाचे संस्थापक, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे प्रमुख, प्राचार्य आर.डी. गायकवाड यांचे ८ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

या निमित्ताने छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे १५ मार्च रोजी शोकसभेचे आयोजन करण्यात आले. रयत सेवकांच्या विद्यार्थ्यात रयत प्रेम रुजवणारा, कर्मवीरांचा व रयत शिक्षण संस्थेचा एक निष्ठावंत कार्यकर्ता गेल्याचे दुःख सर्वांना होतेच, पण त्यांचा झुंजारपणे केलेला प्रवास, प्रेम, आपुलकी, मैत्री, मदत, जिव्हाळा, साधेपणा, कष्टाळूपणा, विनोदबुद्धी, मनमोकळा स्वभाव, संघर्ष इत्यादी अनेक गोष्टी शोकसभेत मनोगतातून व्यक्त झाल्या. कर्मवीरांचा व रयत शिक्षण संस्थेचा विचार निर्भयपणे पुढे घेऊन जाणारा एक बापमाणूस हरपल्याची खंत या सभेत व्यक्त झाली.

या शोकसभेत प्राचार्य आर.डी. गायकवाड यांचे कुटुंबीय,पत्नी प्रा.डॉ. हेमलता गायकवाड, मुलगा सारंग गायकवाड, मुलगी शिल्पा जरे, प्राचार्य आर.के. शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, मुनताजअली शेख, बाबासाहेब बाड, प्राचार्य डॉ. अशोक भोईटे, प्राचार्य डॉ.जे.जी. जाधव, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, रयत शिक्षण संस्थेचे उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, ऑडीट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, माध्यमिकचे सचिव बी.एन. पवार, प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले, प्राचार्य शहाजीराव डोंगरे, प्रा.डी.ए. माने, प्रा.डॉ. भास्करराव कदम आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.



# खालापुरात तणावानंतरही पोलिसांमुळे भाईचारा कायम

**खोपोली: बातमीदार**

गोवंश कत्तलीमुळे हाळखुर्द येथे दगडफेकची घटनेला दोन दिवस झाले असून उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम आणि खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी परिस्थिती कौशल्याने हाताळल्याने वातावरण निवळले असून विशेष म्हणजे हाळ खुर्द ग्रामस्थांनी देखीलकत्तलीचा निषेध करत भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी एकजूट दाखवली आहे.

> **परिस्थिती नियंत्रणात असून कोणत्याही अफवांना नागरिकांनी बळी पडू नये.**
>
> **–सचिन पवार, पोलीस निरीक्षक खालापूर**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १२मार्च रोजी रात्री बारा जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग लगत सागर कॅफे हॉटेलच्या जवळ गोवंशीय जनावरांची कत्तलीचा प्रकार गोरक्षकानी उघडकीस आणला होता.यावेळी आरोपीनी गोरक्षक आणि पोलिसांच्या दिशेने दगड भिरकावाल्याने दोन गोरक्षक जखमी झाले. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी तातडीने अतिरिक्त पोलीस फौज फाटा शिघ्रकृती दल आणि दंगल पथकाला तातडीने पाचारण करण्यात आले होते. मोठ्या प्रमाणात गोरक्षक आणि समर्थक पोलीस ठाण्यात जमा झाले.

गोवंश हत्या करणारे आरोपी आणि दगडफेक करणाऱ्यांवर कठोर कारवाईसाठी सर्वांनी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडला होता. पोलिसांनी पन्नास जणांवर गुन्हा दाखल करत बारा जणांना अटक केली होती. होळी, धूलिवंदन आणि रमजान महिना सुरू असल्याने पोलीस अधिक सतर्क होते. दोनचार समाजविघातक प्रवृत्ती मुळे भाईचारा बिघडत आहे. पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी सातत्याने बैठकीच्या माध्यमातून वातावरणात शांत ठेवण्यात यश मिळवल्याने खालापूरात परिस्थिती आटोक्यात आली आहे.



# कर्जतमध्ये युरिया खताची आवक वाढल्याने बळीराजा खुश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणावर दुबार शेती केली जाते. तसेच वाहत्या पाण्यावर भाजीपाला शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. या सर्वांसाठी आवश्यक असलेले युरिया खताची आवक कर्जत खरेदी विक्री संघात वाढली आहे. मागील पंधरा दिवस खतांचा तुटवडा असल्याने बळीराजा हताश झाला होता. मात्र खतांची आवक वाढल्याने आता बळीराजा खुश झाला आहे.



कर्जत तालुक्यात राजनाला कालव्यात उन्हाळी शेती केली जाते. तेथील दुबार भातशेती साठी शेतकऱ्यांना खताची आवश्यकता जाणवत होती. त्यात कर्जत तालुक्यातील दोन बारमाही वाहत्या नद्यांमध्ये असलेल्या पाण्याचा फायदा घेत भाजीपाला शेती केली जाते. गेल्या काही वर्षात भाजीपाला शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. त्यामुळे शेतकरी विविध प्रकारची खते यांचा वापर भाजीपाला आणि भाताच्या शेतीसाठी करीत असतात. कर्जत तालुक्याला उन्हाळ्यात साधारण १५० टन युरिया खताची आवश्यकता असते. शेतकरी मिश्र खताचा वापर देखील करीत असून दोन प्रकारची मिश्र खते बाजारात उपलब्ध आहेत.

मिश्र खते ही मोठ्या प्रमाणावर आणि मुबलक प्रमाणात बाजारात उपलब्ध आहेत. मात्र गेली काही महिने युरिया खताची कमतरता शेतकऱ्यांना भासत होती. तालुक्याला आवश्यक असलेला युरिया खताचा साठा कर्जत तालुक्यात उपलब्ध नव्हता. तालुक्यात ज्या ठिकाणी मार्केटिंग फेडरेशन कडून खत उपलब्ध होते,त्यांच्याकडून आवश्यकतेपेक्षा कमी साठा उपलब्ध झाला होता.

१५० टन युरिया खताची आवश्यकता असताना कर्जत तालुक्याला ८६ टन खत फेब्रुवारी महिन्यापर्यंत उपलब्ध झाले होते. भाताचे पीक बहरू लागले असताना ५० टक्केच्या आसपास खत कमी प्रमाणात आले असल्याने बळीराजा संकटात सापडला होता. त्यामुळे कर्जत शेतकरी खरेदी विक्री संघाने शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन शासनाकडे खताची मागणी लावून धरली होती. त्यानंतर २५ टन खताचा साठा कर्जत येथे उपलब्ध झाला आहे. खत उपलब्ध झाल्याची माहिती मिळताच खत खरेदी करण्यासाठी शेतकरी कर्जत खरेदी विक्री संघात पोहचत आहेत.

त्या सर्व शेतकऱ्यांनी खताची खरेदी करण्यासाठी येताना केवळ आपले आधार कार्ड सोबत घेऊन यावे. असे आवाहन खरेदी विकी संघाचे व्यवस्थापक केतन खडे यांनी केले आहे.

# इसांबे येथील कारखान्यात महिला कामगाराचा विनयभंग

**खोपोली: बातमीदार**

मैत्री करायचे आहे असे सांगत वाईट हेतूने महिला कामगाराचा हात पकडून तिचा विनयभंग केल्याची घटना इसांबे गावाचे हद्दीत श्री नाखनजी इंटरप्रायझेस कारखान्यात घडली.

पिडीत महिला ही चेंबूर मुंबई,येथील असून खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत इसांबे पोलीस मदत केंद्र हद्दीत श्री नाखनजी इंटरप्रायझेस कारखान्यात काम करते. १३ मार्च रोजी संध्याकाळी पावणेसहा वाजणेचे सुमारास त्याच कारखान्यात काम करणारा आरोपी याने पिडिते जवळ येवुन मला तुझा सोबत मैत्री करायची आहे, लेडीज आणि जेन्टस यामध्ये काय फरक आहे बोलुन फिर्यादी हिचा हात पकडला. पिडितेच्या मनास लज्ञा उत्पन्न केली.पिडितेने कशीबशी सुटका करून घेत सर्व प्रकार घरी सांगितला.

आरोपी विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार प्रिया कांबळे करीत आहेत.

# चाकरमान्यांच्या प्रवासाला वाहतूक कोंडीचे विघ्न

## माणगाव व इंदापूर शहर बायपासच्या अपूर्ण कामाचा चाकरमान्यांना फटका



**माणगाव : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे होळींसाठी मुंबई, पुणे, ठाणे, गुजरात येथील चाकरमनी आपल्या कोकणातील मूळ गावी कुटुंबासमवेत होळी, साजरी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आले होते. त्यातच शनिवार व रविवार हे दोन दिवस सुट्टीचे असल्याने पर्यटक ही मोठ्या प्रमाणात रायगड जिल्ह्यात दाखल झाले होते. त्यांचा परतीचा प्रवास सुरू झाल्याने माणगाव बाजारपेठेत वाहतूक कोंडी सकाळपासूनच झाली होती. ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलीस व माणगाव पोलीस ठिकठिकाणी प्रयत्न करीत होते.

मुंबई गोवा महामार्गावर दुतर्फा वाहनांच्या मोठ्या प्रमाणात रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोडीचा फटका परत निघालेल्या चाकरमानी तसेच पर्यटकांनाही मोठ्या प्रमाणात बसला असून महामार्गावर तासंतास रखडपट्टी झाली आहे. महामार्गावरील माणगाव व इंदापूर बाजारपेठेतील बायपासचे काम अपूर्ण असल्याने प्रवासी नागरिकांना याचा चांगलाच फटका बसला आहे.

होळी सणाला सुरुवात झाल्यापासूनच माणगांवमध्ये वाहतूक कोंडीला प्रवाशांना सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये मुंबई–गोवा महामार्गाचे संथगतीने रुंदीकरण सुरू असल्यामुळे कांही किलो मीटर प्रवासासाठी दोन ते तीन तास लागत होते. मुंबई गोवा महामार्गाचे काम कधी पूर्ण होणार ? व कधी या वाहतूक कोंडीतून सुटका मिळणार असा प्रश्न कोकणवासीयांना पडला आहे.

काही वाहनचालक ओव्हरटेक करतात त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. खेडेगावातून बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना माणगाव शहरामध्ये नाहक त्रास सहन करावा लागला. शहरात रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोटरसायकल व चारचाकी वाहने तासंतास पार्किंग असतात. त्यामुळे ट्रॅफिक जाम होत असते.

परतीच्या प्रवासात त्रास होऊ नये म्हणून मुंबई गोवा महामार्गावर अवजड वाहनांना वाहतूक बंदी करण्यात आली होती. परंतु, त्याचा काही फारसा परिणाम झाल्याचे दिसून आले नाही.

# जावळी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल जावळी शाळेच्या सन २०००–२००१ दहावीतील बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवारी (दि.१५) तालुक्यातील बामणोली रोड मार्गावरील लहाने सुरव गावच्या हद्दीतील बिंदुगडे फार्म हाऊस येथील पियुष ग्रीन रिसॉर्टमध्ये उत्साहात झाला.



२५ वर्षांनी एकत्रित येत या विद्यार्थ्यांनी जुन्या, नवीन आठवणींना उजाळा देत जेवणाचा आस्वाद घेत भरपूर मौजमजा केली. २५ वर्षांनी हे सारे विध्यार्थी स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने शनिवारी एकत्र भेटून त्यांनी आपल्या शाळेतील सर्व जुन्या आठवणींना उजाळा दिला. काहींनी सध्याच्या नवीन आठवणी या निमित्ताने सांगितल्या.

या मेळाव्यात सन २०००– २००१ दहावीतील बॅचचे जगदीश खाडे, राहुल दसवते, भालचंद्र खाडे, आदेश म्हसके, सचिन म्हसके, महेश पालकर,शिवाजी म्हसके, प्रकाश मारणे, समाधान म्हसके, सिद्धेश शिंदे, समीर चेरफळे, नितीन दसवते, राजेंद्र सुतार, सुधीर तेटगुरे, मनोज चेरफळे, राजेश वारिक, शशिकांत शिर्के, सुधीर केकाणे, वनिता तेटगुरे, नीता करकरे, मीनाक्षी पुरी, सुषमा राऊत, सुषमा शिंदे, मंजुळा तेटगुरे आदी माजी विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते.

# शिवकालीन शस्त्रे व मर्दानी खेळाने लोक भारावले

**खोपोली : प्रतिनिधी**

बलिदान मास दिनानिमित्त राष्ट्रवीर संघातर्फे शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिके त्याचप्रमाणे मैदानी खेळ याचे सादरीकरण करण्याच कार्यक्रम लवेज गावी संपन्न झाला.

सौरभ देशमुख,संस्कृतीसाळुंखे व मोनिका देशमुख यांनी युद्ध कलेचे प्रात्यक्षिके व मैदानी खेळाचे सादरीकरण केले यावेळी आशिष खैरे यांनी बलिदान मास का पाळायचा याबाबत मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे शिवकालीन शस्त्रास्त्रांची माहिती व मर्दानी खेळाची माहिती दिली.



# मायलेकीच्या आत्महत्येप्रकरणी नवऱ्याला अटक

**पनवेल : वार्ताहर**

नवऱ्याचे अन्य स्त्रीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याने तो पत्नीला मारझोड करून मानसिक व शारीरिक छळ करीत असल्याने त्यानेच तिला आत्महत्येस प्रवृत्त केले, असा दावा करून सासूने जावयाविरोधात गुन्हा दाखल करताच पनवेल शहर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पळस्पे फाटा येथील मॅरेथॉन नेक्सॉन गृहसंकुलातील औरा इमारतीच्या २९व्या मजल्यावर आशिष दुवा कुटुंब राहत होते. दोन दिवसांपूर्वी आशिषची पत्नी मैथिली हिने पोटची आठ वर्षीय कोवळी मुलगी मायरा हिला निर्दयीपणे बेडरूमच्या खिडकीतून फेकून हत्या केली. त्यानंतर स्वतःची जीवनयात्रा संपविण्यासाठी त्याच खिडकीतून उडी घेत आत्महत्या केली. या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे. पनवेल शहर पोलिसांनी दोन्ही मृतदेह ताब्यात घेवून मयत मैथिली हिच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर शवविच्छेदन करून दोन्ही मृतदेह आशिष दुवाच्या ताब्यात दिले. त्या दोघींवर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, मैथिलीची आई आणि आशिषची सासू असलेल्या नीता सुहास देवराईकर (रा. अहिल्यानगर) यांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत त्यांच्या मुलीच्या आत्महत्येला जावई कारणीभूत असून त्याचे विवाहबाह्य संबंध आहेत.

त्यामुळे तो पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ करीत असल्याने तीने हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे म्हटले आहे. मैथिलीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल आशिष दुवाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल करून तो पळून जाऊ नये याची दक्षता घेवून त्याला अंत्यविधीनंतर पुण्यातून ताब्यात घेऊन त्याला अटक केली आहे.

## दागिने हिसकावणाऱ्याला अटक




**पनवेल : वार्ताहर**

सोन्याच्या दुकानातील सोन्याची चेन आणि अंगठी असा एक लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल हातातून हिसकावून चोरट्याने पलायन केल्याची घटना कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

जीतमल शर्मा यांचे कळंबोली सेक्टर १ इ येथे रुचिता ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. त्यांच्या दुकानात एक अज्ञात व्यक्ती आला व त्याने सोन्याची चेन आणि अंगठी विकत घ्यायची आहे, असे सांगितले. त्यावर त्याला दुकानदाराने चेन आणि अंगठी दाखवली. दरम्यान, दुकानदार त्याला त्याची किंमत सांगत असताना या चोरट्याने त्याच्या हातातून चेन आणि अंगठी हिसकावून घेत दुकानातून पलायन केले.

दुकानदाराने चोर चोर असा आरडाओरडा करत त्याचा पाठलाग केला असता, दक्ष नागरिकांनी त्याच्यावर झडप घालून त्याला पकडले. मयूर प्रकाश बाड (रा. सेक्टर ५-ई, कळंबोली) असे त्याचे नाव असून तो मूळगाव सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील राहणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## निवडक

### दोन दुचाकीच्या धडकेत एक ठार

**पनवेल :** तालुक्यातील मालडुंगे गावाच्या हद्दीत झालेल्या दोन मोटरसायकलच्या अपघातात एक ठार तीन जखमी झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात मैद्या पांडू चौधरी हे मयत झाले आहेत. तर मधु निरगुडा, साहिल निरगुडा, दिलीप निरगुडा हे जखमी झाले आहेत. मालडुंगे गावाजवळ उतारावर हा अपघात झाला असून या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### तक्रार निवारण दिन साजरा

**पनवेल :** महाराष्ट्र शासन, क्षेत्रीय कार्यालयांसाठीच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा अंतर्गत पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे तक्रार निवारण दिन साजरा करण्यात आला. वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तक्रार निवारण दिन साजरा करण्यात आला. या वेळी उपस्थित अर्जदार व गैर-अर्जदार यांच्या तक्रारी समजून घेऊन त्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून निरसन करण्यात आले. तसेच सायबर सुरक्षा, महिला, ज्येष्ठ नागरिक संबंधित गुन्हे, नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन करून नवी मुंबई व्हॉट्सअॅप चॅनल तसेच इतर हेल्पलाइन क्रमांकांविषयी माहिती देण्यात आली.



# खारघरमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

### * आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती





**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त सेक्टर २० मधील हावरे स्पेडर ग्लोरी क्लब हाऊसमध्ये आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी (दि.१६) करण्यात आले होते. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजासमोर आदर्श ठेवण्याचे काम झाले असल्याचे गौरोद्गार काढले तसेच त्यांनी खारघर परिसराचा विकास चांगल्या पद्धतीने करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावे, असे आवाहन उपस्थित नागरिकांना केले.

जागतिक महिला दिनाचे औचित्यसाधून भारतीय जनता पक्ष आणि प्रभाग क्रमांक ४च्या उपाध्यक्षा झुमा चक्रवर्ती यांच्या आयोजनातून मोफत हेल्थ चेकअप आणि रक्तदान शिबिर अमृतवेल आयुर्वेद पंचकर्म सेंटरच्या डॉ.ज्योती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिबिराला भेट देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच महिला दिनानिमित्त फक्त महिलांसाठीच नाही तर सर्व नागरीकांसाठी आरोग्य शिबिर आयोजित केल्याबद्दल आयोजकाचे कौतुक केले. या शिबिराला शिबिराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला असून यात मध्ये कास्य थाली फूट मसाज, ० ते १५ वर्ष वयोगटातील मुलांशाठी सुवर्णप्राशन, त्वरीत वेदना निवारण शिबिर, हाडांची तपासणी, दंत तपासणी करण्यात आली.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, दिलीप जाधव, आयोजक प्रभाग क्रमांक ४च्या उपाध्यक्षा झुमा चक्रवर्ती, युवा मोर्चाचे खारघर शहर सचिव आदित्य हातगे, चेअरमन शिवम सिंग, सतीश सहस्त्रबुद्धे, प्रदीप भट यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## टाकी गावात १९ मार्चला परागंदा नाटकाचे सादरीकरण

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील टाकीगाव येथील श्री राधाकृष्ण नाट्य मंडळाच्या वतीने परागंदा ही संगीत सामाजिक नाट्य कलाकृती सादर केली जाणार आहे.

तालुक्यातील टाकीगाव येथील श्री राधाकृष्ण मंदिराच्या जीर्णोद्वाराच्या ३४व्या वर्धापन दिनानिमित्त, रंगकर्मी स्वर्गीय वसंत नाईक यांच्या स्मृतीस अभिवादन करून, ही संगीत सामाजिक नाट्यकलाकृती बुधवारी (दि.१९) सादर केली जाणार आहे.

या वेळी व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती ज्येष्ठ रंगकर्मी अरुण नाईक यांनी दिली. नाटकाचे लेखन प्रकाश तारी यांनी. तर दिग्दर्शन नटवर्य स्वर्गीय नाना पाटील व गोमा ठाकूर यांचे शिष्य सदानंद कोळी व जयवंत पाटील यांनी केले आहे. या नाटकाची प्रमुख निर्मिती उद्योजक अरुण नाईक, दीपक नाईक, एन एन नाईक, क्रांती जोशी, सुरज म्हात्रे, विजय कोळी, डॉ. प्रदीप परदेशी व मनोज पाटील यांची आहे. यात एन एन नाईक, शरद म्हात्रे, ओमकार नाईक, प्रितेश कोळी, भूषण पाटील, अमेय पाटील, सुरेश जोशी, संजय कोळी केतन नाईक, सागर कोळी, साक्षी म्हात्रे (पनवेल) सार्थ कोळी आदी कलाकार आपल्या अभिनयातून भूमिका बजावणार आहेत.

रंगभूषा उदयराज तांगडी यांची आहे. ध्वनी संकलन प्रशांत डेकोरेटर्स कोप्रोली यांचे आहे. पार्श्वसंगीत अविनाश गावणकर, नेपथ्य शेखर पाटील, सहाय्यक म्हणून अशोक नाईक, रवींद्र जोशी, विकास पाटील, समीर पाटील, प्रसन्न कोळी हे कामगिरी बजावणार आहेत.

## संशोधन लेख सादरीकरण स्पर्धेत रामशेठ ठाकूर महाविद्यालय द्वितीय



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागाने सेंट आर्नोल्ड कॉमर्स व आर्टस नाईट डिग्री कॉलेज व इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन नॉलेज अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१५) आयोजित केलेल्या संशोधन लेख सादरीकरण स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.

महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील प्रथम वर्षातील अनस लखानी, तौसीफ शेख व शौर्य बॅनर्जी या तिघांनी दिलेल्या विषयावरती संशोधन लेख सादर केले. या स्पर्धेसाठी प्रा. योगिता पाटील यांनी या तिघांना लेख लिहिण्यापासून ते लेख सादरीकरणापर्यंत मोलाचे मार्गदर्शन केले आणि त्यांच्या मार्गदर्शनामुळे त्यांना द्वितीय क्रमांक पटकाविता आला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या तिघांचे अभिनंदन केले तसेच शुभेच्छा दिल्या.

या तिघांना अकाउंट व फायनान्स विभागातील सर्व प्राध्यापक तसेच विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

## प्राथमिक आदर्श केंद्रशाळा चिरनेरचे वार्षिक स्नेहसंमेलन



**उरण : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद केंद्रशाळा चिरनेरचे वार्षिक स्नेहसंमेलन शाळेच्या भव्य प्रांगणात मोठ्या उत्साहात झाले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन उद्योगपती राजाशेठ खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस गणपती, सरस्वती आणि हिंदवी स्वराज्याचे छत्रपती, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आणि दिप प्रज्वलनाने झाली.

या वेळी उद्योगपती राजाशेठ खारपाटील, रायगड जिल्हा उत्कर्ष समितीचे अध्यक्ष मिलिंद खारपाटील, सरपंच, उपसरपंच, माजी सभापती शुभांगी पाटील, ग्रामपंचायत सदस्य पद्माकर फोफेरकर, निकिता नारंगीकर, निलम चौलकर, भारती ठाकूर, उरण इंटकचे अध्यक्ष राजेंद्र भगत, सेवानिवृत शिक्षक अशोक कांबळे, आदर्श शिक्षिका चैताली म्हात्रे, ज्योती म्हात्रे, शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सचिन म्हात्रे, माजी अध्यक्ष प्रवीण म्हात्रे, शाळा व्यवस्थापन कमिटी चे सदस्य गजेंद्रसिंग राजपुरोहित, मुख्याध्यापक विश्वनाथ गावंड आणि शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

## तळोजा मजकूरमध्ये शिवरायांच्या मंदिराचा वर्धापन दिन

**तळोजा : रामप्रहर वृत्त**

तळोजा मजकूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचा पहिला वर्धापन दिन रविवारी (दि.१६) मोठ्या भक्तीपूर्ण वातावरणात साजरा झाला. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले.

रायगडमधील श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य दिव्य मंदिर तळोजा मजकूर येथे उभारण्यात आले आहे. या मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. यात मुर्ती अभिषेक, पुजन तसेच शिवकिर्तनकार ह.भ.प. संतोष महाराज सते यांचे किर्तन झाले. वर्धापन दिनानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंदिराला भेट देत दर्शन घेतले.



या वेळी त्यांच्यासोबत माजी नगरसेवक हरेश केणी, सरपंच संतोष पाटील, निर्दोष केणी, संतोष पाटील, सुनील पाटील आदी उपस्थित होते.



## श्रीराम जोशींनी केले २५० वेळा प्लेटलेट दान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजसेवा हाच एक ध्यास याचे तंतोतंत व्यक्तीमत्व श्रीराम जोशी आहेत, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण त्यांनी अनेकांचे जीव वाचवले आहेत. त्यांनी आतापर्यंत २५० वेळा प्लेटलेट दान केले आहे.



आजकाल स्वार्थापोटी नाती जोडणारी अणि वेळ प्रसंगी नाती तोडणारी अनेक माणसे आपल्याला विविध रुपात दिसतात, भेटतात त्यात अनोळखी माणसांचे प्राण वाचण्यासाठी आपले व्यवधान सांभाळत... आपला बहुमूल्य वेळ..शारीरिक अणि आर्थिक त्रासाची तमा न बाळगता अविरत आपले प्लेटलेट डोनेशनचे कार्य करणारे श्रीराम जोशींचे अनेक जण कौतुक करीत आहेत.

यांच्या कार्याचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. होळीच्या शुभमुहूर्तावर खारघर येथील टाटा हॉस्पिटलमध्ये त्यांनी २५० वेळा प्लेटलेट दान करत होळीचा सण खऱ्या अर्थाने साजरा केला. या वेळी मंजिरी श्रीराम जोशी उपस्थित होत्या.

# वासांबे ग्रामपंचायत परिसर प्लास्टिकमुक्तीकडे

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायत ही रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असणारी ग्रुप ग्रामपंचायत असून ग्रामपंचायतीचा विस्तारही मोठा आहे. माझी वसुंधरा अभियान ५.० यशस्वी करण्यासाठी वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा संदीप मुंढे, उपसरपंच भुषण पारंगे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांनी शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत.

ग्रामपंचायतीला स्वच्छता कमिटी, व्यापारी वर्ग, आशा सेविका, महिला बचत गट आणि ग्रामस्थांकडून सहकार्य होत असल्याने ग्रुप ग्रामपंचायत वासांबे यांनी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यास सुरुवात केली असून त्यामुळे पर्यावरण संतुलन बरोबर सामाजिक कार्य ग्रामपंचायतीकडून होताना दिसत आहे.



माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांनी ग्रामपंचायत हद्दीतील रहदारीची ठिकाणे, वळण, रस्त्यालगतच्या मंदिरांच्या भिंती आदींवर घोषवाक्य लिहून आकर्षक रंगरंगोटीतून जनजागृती केल्याचे दिसत आहे. वासांबे-मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीकडून नवीन बांधकाम परवाना देताना पर्यावरण संतुलन तसेच गटार, पाणी याचे नियोजन, डासमुक्त परिसर, नवीन बांधकाम करताना ते पर्यावरण पुरक, झाडे लावणे व ती जोपासना करण्यासाठी आणि नियमांना बांधिल राहील, याकडे ग्रामपंचायतीने लक्ष दिले आहे.

झाडांच्या बिया गोळा करण्यात येत असून सीडबॉल तयार करण्यात येत आहेत, गाव आदिवासीवाडी वस्ती येथील शाळांमधून मुलांच्या कौशल्य गुणांची पारख करून त्यांना मदत आणि प्रोत्साहन देऊन त्यांच्या कला गुणांना वाव दिला जात असून त्यांच्याही माध्यमातून माझी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे. प्लास्टिक पिशव्या बंदी करण्यासाठी स्वच्छता कमिटी मोहोपाडा मुख्य बाजारपेठेत स्वच्छता मोहिम गेल्या तीन महिने राबवित असल्याने दुकानदारांनी कापडी पिशव्या वापरण्यावर अधिक भर दिला आहे.

आपत्ती व्यवस्थापन शिबिर, लावलेल्या वृक्षांची जोपासना करून नवीन झाडांची लागवड केली आहे. ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, ग्रामस्थ, विद्यार्थी यांनी झाडे दत्तक घेतली आहेत. भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंच महाभूते या पंच महाभूते तत्वांचा आधारे प्रत्यक ग्रामपंचायत सदस्य आपल्या प्रभागात प्रभावी काम करण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

माझी वसुंधरा अभियान हे अभियान न राहता ते कायमस्वरुपी ठेऊन पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी काम केले जात असल्याचे सरपंच उमा संदीप मुंढे आणि ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांनी सांगितले.

## संपादकीय

# उन्हाच्या झळा असह्य!

राज्यातील तापमान वाढले असून उन्हाचा तडाखा गडद होऊ लागला आहे. उष्णतेच्या झळा आणि उकाड्यामुळे सर्वच ठिकाणचे नागरिक हैराण झाले आहेत. दिवसा कडाक्याचे ऊन तसेच उष्ण व दमट वातावरण सध्या आहे. वाढते तापमान लक्षात घेता नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे.

**हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार तापमानाचा पारा दिवसेंदिवस वर सरकू लागला आहे. संध्याकाळीही वातावरणात उष्मा राहत असल्याने उकाड्याचा त्रास वाढत आहे. यंदा मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाचा पारा चढा असल्याचे जाणवायला लागले. सकाळच्या काहीशा गारव्यानंतर दिवसभर मात्र उन्हाची तीव्रता असल्याने आरोग्यावरही त्याचा मोठा परिणाम दिसून येतो. सर्वसाधारपणे तापमानाचा पारा ३५ अंशाच्या पुढे सरकला आहे. विदर्भात तर पाऱ्याने चाळीशी ओलांडलीय. सूर्य जणू आग ओकतोय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सकाळी १० वाजल्यापासून ऊन तापायला सुरुवात होते. त्यामुळे सकाळपासूनच उन्हाचे चटके बसायला सुरुवात होते. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास सूर्य डोक्यावर येऊ लागला की झळा असह्य होऊ लागतात. परिणामी दुपारच्या वेळेत शहरातील रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येतो. चढलेल्या पाऱ्याने कमालीचा उकाडा वाढला आहे. त्यामुळे दुपारच्या वेळी रस्ते नागरिकांविना ओस पडलेले दिसत आहेत. सूर्याचा वाढता पारा पाहून नागरिकांनी घराबाहेर न पडणेच पसंत केले आहे, परंतु अत्यावश्यक कामे करायवची असलेल्यांना आणि चाकरमान्यांना बाहेर पडण्याशिवाय पर्याय नाही. बदलत्या वातावरणाशी जुळवून घेताना नागरिकांना त्रास जाणवत आहे. उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी लोक डोक्यात टोपी, डोळ्याला गॉगल आणि इतर तत्सम वस्तूंचा वापर करत आहे. उन्हाची तीव्रता वाढत असल्याने शीतपेयांच्या दुकानांवरही लोकांची गर्दी होत असल्याचे पहावयास मिळते. त्यामुळे सरबत, ज्युस, रसरशीत व पाणीदार फळांनाही मागणी वाढली आहे. उष्णतेच्या लाटेमुळे शरीरावर गंभीर परिणाम होतात. प्रसंगी अतिरिक्त ताण निर्माण होऊन मृत्यू होण्याची शक्यता आहे. उष्माघातामुळे मृत्यूदेखील ओढावू शकतो. काही दिवसांपूर्वी सांगलीत एका आईस्क्रीम विक्रेत्याचाच उष्माघाताने मृत्यू झाला होता. राज्यातील यंदाच्या हंगामातील हा उष्माघाताचा पहिला बळी. उन्हाचा पारा एप्रिल, मे महिन्यात अधिक प्रमाणात दिसून येईल अशी चिन्हे आहेत. तापमान वाढू लागल्याने नागरिकांनी योग्य खबरदारी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून केले जात आहे. जागतिक तापमानवाढीचे दुष्परिणाम सर्वांनाच भोगावे लागत आहेत. तापमानवाढीमुळे निर्माण होणाऱ्या उष्णतेच्या लाटा लोकांना अक्षरश: भाजून काढत आहेत. १९७९पासून जगातील बहुतांशी लोकसंख्या अधिक काळासाठी उष्ण तापमानाचा सामना करीत आहे. उष्णतेच्या लाटा उद्‌भवण्याचे प्रमाणही जागतिक पातळीवर तब्बल ६७ टक्क्यांनी वाढले आहे. उष्णतेच्या लाटांच्या काळात नोंदलेले सर्वोच्च तापमान हेही ४० वर्षांपूर्वीच्या तापमानाच्या तुलनेत अधिक आहे. या लाटांनी अधिक क्षेत्र कवेत घेतले आहे. सायन्स ॲडव्हान्सेसच्या संशोधन पत्रिकेत हे निष्कर्ष प्रसिद्ध झाले आहेत. यावर साधा व सोपा उपाय म्हणजे जास्तीत जास्त झाडे लावणे. उन्हाळ्यात उन लागते म्हणून सर्वच जण झाडांच्या सावलीचा आधार घेतात. अशा वेळी वनसंपदेचे महत्त्व मनोमन पटते, पण उन्हाळा संपल्यावर गरज सरो अन् वैद्य मरो या उक्तीप्रमाणे किती जण झाडे लावतात व प्रामाणिकपणे त्यांची निगा राखतात हा खरा प्रश्न आहे. प्रदूषणवाढ व इतरही काही मुद्दे उष्णतावाढीस पूरक ठरतात. स्वतःसह पुढील पिढीसाठी पर्यावरणावरणविषयक सजग होणे काळाची गरज आहे.**

# कर्जतमध्ये रक्तदानाची ऐतिहासिक चळवळ





**खबरबात**
विजय मांडे

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान समजले जाते. रक्तदानाचा प्रसार व प्रचार कर्जत तालुक्यात यशस्वीपणे झाला. अगदी आदिवासी ग्रामीण भागात सुद्धा रक्तदानाचे महत्व पटू लागल्याने तालुक्याच्या शेवटच्या टोकाला सुद्धा रक्तदान शिबिरांचे आयोजन केले तरी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. कर्जत तालुका रक्तदान शिबिरे आयोजनात राज्यात प्रथम क्रमांकावर असेल. त्याचे संपूर्ण श्रेय सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांना द्यावे लागेल. म्हणूनच त्यांना 'सार्वजनिक रक्तदाता' ही पदवी न कळत पणे बहाल केली गेली. त्यांनी आत्तापर्यंत ५११ रक्तदान शिबिरांचे आयोजन केले असून तब्बल ६२ हजार ४०० रक्त पिशव्यांचे संकलन केले आहे.

राजाभाऊंचे खरे नाव राजेश शांतीलाल कोठारी. वाणिज्य पदवी घेतल्यानंतर राजाभाऊंची नोकरी करण्याची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी पुंडलिक तथा बंधू पाटील यांना भेटून आपला मनोदय बोलून दाखविला. बंधूंनी त्यांना नोकरी ऐवजी कोचिंग क्लासेस सुरू करण्याचा सल्ला दिला आणि राजाभाऊ मास्तर झाले. अनेक जण त्यांच्या क्लासमध्ये शिकून मोठे झाले. फी न भरणाऱ्या अनेक जणांना त्यांनी मोफत शिकवले आहे. आतापर्यंत तीन हजारच्या वर विद्यार्थ्यांना त्यांनी एकही पै फी न घेता शिकविले. ते आता मोठ मोठ्या पदावर आहेत. क्लास घेता - घेता त्यांच्या मनात रक्तदान शिबिर आयोजित करून गरजूंना रक्त मिळावे असे आले आणि त्यांनी त्या दृष्टीने सुरुवात केली.

८ जानेवारी १९८९ रोजी त्यांनी डॉ. हेगडेवार जन्मशताब्दी निमित्त पहिले रक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्यावेळी तब्बल २०९ रक्त बाटल्या संकलित केल्या. त्यामुळे त्यांच्यामध्ये रक्तदानाबद्दल विशेष आवड निर्माण झाली. आत्तापर्यंत त्यांनी १०८ वेळा रक्तदान केले आहे तर आजपर्यंत कर्जत, खालापूर तालुक्यात ५११ रक्तदान शिबिरांचे आयोजन करून ६२ हजार ४०० रक्त बाटल्या संकलित केल्या आहेत. जेष्ठ निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरणाच्या दिवशी त्यांनी श्रीसदस्यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करून ५२१ रक्त बाटल्या संकलन केल्या. हा कर्जत तालुक्यातील आजवरचा विक्रम आहे. सुरुवातीला इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या रामदास उन्हाळकर आणि डॉ. अजित कदम राजाभाऊंना खूप सहकार्य केले. त्यांनतर आता घटकोपरच्या सर्वोदय हॉस्पिटलच्या समर्पण रक्त पिढीचे सहकार्य त्यांना लाभत आहे. २५ रक्तपेढ्या या चळवळीत सहभागी असून ७५ संस्था शिबिरांचे आयोजन करून रक्त संकलनाचे काम करतात.

राजाभाऊंचा राज्यपाल, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आदींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना अनेक पुरस्कार सुद्धा मिळाले आहेत. त्यांनी कर्जतमधील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, ओंकार मित्र मंडळ, जैन समाजेवण संघटना, अनिरुद्ध उपासना ट्रस्ट, कर्जत प्रेस क्लब, नेताजी संघ वदप तसेच विविध राजकीय पक्षाच्या वतीने रक्तदान शिबिरांचे आयोजन नेहमीच केले जाते. तसेच कोंकण ज्ञानपीठ संस्थेची तीनही महाविद्यालये गेल्या अठरा-विस वर्षे सातत्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करीत असतात. २००७ साली कर्जतकरांनीसुद्धा त्यांच्या कार्याची दखल घेऊन खासदार भारतकुमार राऊत, अभिनेते अरुण नलावडे, अनंतकाका जोशी यांच्या उपस्थितीत त्यांचा नागरी सत्कार केला होता. त्या वेळी त्यांना एक लाख रुपयांचा निधी दिला होता. तो निधी त्यांनी बँकेत ठेव म्हणून ठेऊन येणाऱ्या व्याजातून ते गरीब व गरजू लोकांना शंभर रक्त पिशव्या मोफत देतात. राजाभाऊंना रक्तदान शिबिरासाठी त्यांच्या कुटुंबीयांनी नेहमीच त्यांना सहकार्य केले आहे.

# समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ



सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या व शिक्षणतज्ञ. जन्म पुणे येथे १७ मार्च, इ.स. १९१० रोजी झाला. त्यांचे वडील बालकृष्ण वाघ हे सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरीस होते. आई यमुनाबाई सोनोरी येथील सरदार पानसे यांच्या घराण्यातील होत्या. वयाच्या तेराव्या वर्षी शंकर जातेगावकर यांच्याशी अनुताईंचा विवाह झाला परंतु सहा महिन्यांतच त्यांना वैधव्य प्राप्त झाले. तत्कालीन सामाजिक चालीरीती व स्त्रीजातीवरील बंधने झुगारून त्यांनी आपले अध्ययन पुढे चालू ठेवले. अध्यापकीय प्रशिक्षण परीक्षेत त्या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या त्यांनी सुरुवातीस नासिक विभागात खेडेगावांतून प्राथमिक शिक्षिका म्हणून तीन वर्षे नोकरी केली. त्यानंतर त्या पुण्यात हुजूरपागा प्राथमिक विद्यालयात नोकरीस लागल्या आणि रात्रशाळेत शिक्षण घेऊन मॅट्रिक झाल्या.

महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला' या आदेशातून प्रेरणा घेऊन १९४५ साली मुंबईमधील बोरिवली भागात भरलेल्या ग्रामसेविकांच्या प्रशिक्षण शिबिरात दाखल झाल्या. त्या वेळी ताराबाई मोडक यांच्याशी परिचय झाला आणि अनुताईंच्या सर्जनशील गुणांना चालना मिळाली व त्यांतून त्यांचे ग्रामीण भागातील अध्यापनकार्याचे ध्येय साकारले. ताराबाई मोडक. यांच्या प्रयोगशीलतेला अनुताईंच्या निर्मितिक्षमतेची जोड मिळाली बोर्डी व नंतर कोसबाड या बालशिक्षणाच्या प्रयोगशाळाच बनल्या. ताराबाईंच्या मृत्यूनंतर या संस्थांची पूर्ण धुरा अनुताईंनी अखेरपर्यंत सांभाळली तसेच त्यांचा विस्तारही केला. आदिवासींच्या कल्याणासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांच्या विधायक व भरीव कार्याबद्दल त्यांना केंद्र शासनाने 'पद्मश्री' हा किताब देऊन त्यांचा सन्मान केला. २७ सप्टेंबर १९९२ रोजी त्यांचे निधन झाले.



## बदलते तंत्रज्ञान

# इन्स्टाग्रामवर डीएम् शेड्युल करता येणार

अल्पवाधीत तरुणांच्या आणि नेटकऱ्यांच्या गळ्यातील ताईत बनलेल्या इन्स्टाग्रामवर सातत्याने नवनवे बदल होत आहेत. वापरकर्त्यांना सोयीचे आणि उपयुक्त ठरतील असे बदल सातत्याने केले जातात. त्यामुळे व्हिडिओ, मिम्स आणि फोटो शेअर करण्यासाठी इन्स्टाग्राम प्रसिद्ध आहे. आता इन्स्टाग्रामने नवं फिचर आणलं आहे. यामुळे वापरकर्ते डीएम शेड्युल करू शकणार आहेत.



इन्स्टाग्रामवर मेसेज शेड्युल करण्याची सोय केल्याने याचा फायदा बऱ्याच वापरकर्त्यांना होणार आहे. विशिष्ट वेळी मिम्स शेअर करू इच्छिणाऱ्या किंवा विशिष्ट वेळी प्रेक्षकांशी संवाद साधू इच्छिणाऱ्या कंटेट क्रिएटर्सना या फिचरचा फायदा होणार आहे. त्यामुळे, इन्स्टाग्रामवर मेसेज कसा शेड्युल करायचा हे जाणून घ्यायचं असेल तर खाली आम्ही तुम्हाला सोपी पद्धत सांगत आहोत.

### इन्स्टाग्रामवर डीएम कसं शेड्यूल करायचं?

इन्स्टाग्राम सुरू करा आणि होम स्क्रीनवरून उजवीकडे स्वाइप करून किंवा वरच्या उजव्या कोपऱ्यातील मेसेज पर्यायावर टॅप करून डायरेक्ट मेसेजेस (DMs) विभागात जा. आता, तुम्हाला ज्या संभाषणासाठी मेसेज शेड्युल करायचा आहे, त्यांचा टेक्स्ट बॉक्स उघडा.

त्या टेक्स्ट बॉक्समध्ये जे टाईप करायचं आहे, ते टाईप करून घ्या.

सेंड बटण दाबण्याऐवजी, त्यावर जास्त वेळ दाबा आणि एक नवीन मेसेज शेड्यूल करा पर्याय दिसेल.

येथे, तुम्हाला संदेश पाठवायचा असलेली तारीख आणि वेळ सेट करा आणि पूर्ण झाल्यावर निळ्या बटणावर टॅप करा. इन्स्टाग्राम तुम्हाला २९ दिवस आधी मेसेज शेड्यूल करण्याची परवानगी देतो आणि तुम्ही चॅट उघडता तेव्हा प्रत्येक वेळी संभाषणाच्या तळाशी एक लहान शेड्यूल्ड मेसेज बॅनर दाखवेल. जर तुम्ही त्यावर टॅप केले तर एक नवीन स्क्रीन उघडेल जिथे तुम्ही तुमचे सर्व शेड्यूल केलेले मेसेज पाहू शकता.

सोशल मीडिया ॲप इन्स्टाग्रामची मालकीही मार्कस झुकेरबर्ग याच्याकडे आहे. त्यांची कंपनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर नवनवीन फिचर्स आणत असतात, जेणेकरून युझर वापर करून टिकू शकतील.

# भारतीय वंशाची अंतराळवीर कल्पना चावला



**निमित्त**

कल्पना चावला ह्या जन्माने भारतीय असलेल्या प्रथम महिला आणि राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात गेलेल्या दूसरया भारतीय व्यक्ति होत्या. त्यांचा जन्म १९६१ मध्ये हरियानामधील करनाल येथे झाला. कल्पना चावला यांच्या वडिलांचे नाव बनारसी लाल तर आईचे नाव संयोगिता चावला. त्यांच्या वडिलांचे औद्योगिक वस्तु निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई घर सांभाळायची. त्यांच्या आईला आपल्याला मुलगा व्हावा अशी इच्छा होती, पण त्यांना कुठे ठावूक होते कि आपली मुलगी संपूर्ण जगात नाव कमावेल! त्यांचे शिक्षण टागोर विद्यालय येथून झाले.

१९८२ साली त्या अमेरिकेत गेल्या. १९८४ साली त्यांनी टेक्सास विद्यापीठातून एरोस्पेस इंजीनिरिंग ची मास्टर ऑफ़ सायन्स ही पदवी मिळवली. त्यांना अन्तराळवीर होण्याच्या स्वप्नाने असे पछाडले होते त्यांनी १९८८मध्ये कोलेराडो मधून एरोस्पेस मध्ये डॉक्टरेट मिळवली. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओवरसेट मेथड्सच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तेथे त्यांनी कोम्प्यूटेशनल फ्लूइड डायनामिक्स मध्ये जागेवरच उभे उड्डाण, कमी अंतरात उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लाइडर्स, सीप्लेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने यांच्या व्यवसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला.१९९१ मध्ये त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाल्यानंतर त्यांनी नासामध्ये ॲस्ट्रॉनॉट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना मार्च १९९५ साली तेथे प्रवेश मिळाला. त्यांनंतर त्यांची १९९६ मध्ये पहिल्या उड्डानासाठी निवड झाली. यानात शून्य गुरुत्त्वकर्षणाच्या अवस्थेत असताना त्या म्हणाल्या तुमचे अस्तित्व हे तुमच्या हुशारीमुळे असते. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमि प्रवास केला.त्यांची पाहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालु झाली. त्या ६ अंतराळविरांच्या चमुचा एक भाग होत्या.व हा चमु कोलंबिया स्पेस शटल एस.टी.एस ८७ चे चालन करत होता. त्यांच्या पहिल्या मोहिमेत त्या ३७२ तास अंतराळात होत्या. एस.टी. एस-८७ मोहिमेदरम्यान त्यांच्यावर नादुरुस्त असलेला स्पार्टन उपग्रह विंस्टन स्कॉट आणि तकाओं दोई यांच्याबरोबर स्पेसवॉक करुन तो दुरुस्त करने ही जबाबदारी होती. या मोहिमेनंतर त्यांना अंतराळ स्थानकावर काम करायचे होते. १६ जानेवारी २००३ रोजी चावला दुर्दैवी एस. टी. एस.१०७ मोहिमेवर जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमूला जवळजवळ ८० प्रयोग करावयाचे असून त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिति, अंतराळविरांचे आरोग्य आणि सुरक्षितता या विषयांचा समावेश होता.चावला यांचा मृत्यु १ फेब्रुवारी २००३ रोजी अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात पुनरप्रवेश आणि करताना जमिनीवर उतरताना अपघातात झाला. त्यांच्यासोबत असलेल्या सर्व चमूचा त्यात दुर्दैवी अंत झाला.त्यांना मरणोत्तर कांग्रेशनल स्पेस चे सन्मान पदक, नासा स्पेस फ्लाइट चे पदक तसेच नासा विशेष सेवा पदक बहाल करण्यात आले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# जेवणानंतर गोड खाण्याची इच्छा का होते?

जेवणानंतर आपल्याला गोड पदार्थांची तीव्र इच्छा होते हे आपल्या खाण्याच्या वर्तनावर परिणाम करणाऱ्या जैविक, मानसिक आणि संवेदी घटकांमुळे होते. जेवणानंतरही आपल्याला गोड पदार्थांची इच्छा होण्याचे एक मुख्य कारण म्हणजे सेंसरी-स्पेसिफिक सॅटीटी. ही संकल्पना विशिष्ट प्रकारच्या अन्नाचे मोठ्या प्रमाणात सेवन केल्याने मिळणारा आनंद कमी होण्याशी संबंधित आहे. उदाहरणार्थ- जर तुम्ही नुकतेच चविष्ट जेवण घेतले असेल, तर तुमचे चव रिसेप्टर्स त्या चवींबद्दल असंवेदनशील होतात; परंतु ते गोड चवींना अत्यंत तीव्र प्रतिसाद देतात. म्हणूनच पोट भरले असतानाही गोड पदार्थ खाण्याचा विचार आकर्षक राहतो. जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याच्या आपल्या इच्छेत मेंदू महत्त्वाची भूमिका बजावतो विशेषतः साखर आणि फॅट्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने डोपामाइन बाहेर पडण्यास सुरुवात होते, जे आनंद आणि बक्षीस मिळाल्याचा भावनेशी संबंधित एक न्यूरोट्रान्समीटर आहे. डोपामाइनची ही वाढ आपले पोट तांत्रिकदृष्ट्या भरलेले असले तरीही अधिक गोड खाण्याची इच्छा वाढवते. मिष्टान्नांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याने, ते मेंदूला एक बक्षीस मिळाल्याच्या भावनेचे तीव्र संकेत देतात, ज्यामुळे त्यांना प्रतिकार करणे कठीण होते. ऐतिहासिकदृष्ट्या आपल्या पूर्वजांना उच्च कॅलरीयुक्त अन्न मर्यादित प्रमाणात उपलब्ध होते, म्हणून जेव्हा जेव्हा ते उपलब्ध असेल तेव्हा तेव्हा फळे आणि मध यांसारख्या ऊर्जासमृद्ध पदार्थांचे सेवन करणे जगण्यासाठी फायदेशीर होते. आपले शरीर आणि मेंदू अजूनही शक्य तितक्या वेळा कॅलरीयुक्त अन्न शोधण्यासाठी सज्ज असते, विशेषतः जेवणानंतर जेव्हा पचन सुरू असते तेव्हा.रक्तातील साखरेचे नियमन आणि हार्मोनल प्रभाव जेव्हा आपण कार्बोहायड्रेट्सयुक्त जेवण खातो तेव्हा आपल्या रक्तातील साखरेची पातळी वाढते, ज्यामुळे ग्लुकोजचे नियमन करण्यासाठी इन्सुलिन सोडले जाते. या प्रक्रियेनंतर रक्तातील साखरेचे प्रमाण जलद कमी झाल्यास पातळी पुन्हा स्थिर करण्यासाठी अधिक गोड खाण्याची इच्छा निर्माण होऊ शकते. याव्यतिरिक्त घ्रेलिन आणि लेप्टिन यांसारखे हार्मोन्समध्ये जेवणानंतर चढ-उतार होतात, कधी कधी मिश्रित संकेत तयार होतात, ज्यामुळे आपल्याला जास्त अन्नाची आवश्यकता नसतानाही गोड खाण्याचीही इच्छा होते.



# पेणमध्ये हजारोंचा गांजा जप्त

## पोलिसांच्या नाकाबंदीत ३२ वाहनांवर कारवाई

**पेण : प्रतिनिधी**

होळी, धुलीवंदन, ईद, रंगपंचमी आदी सणांदरम्यान पेण तालुक्यातील नागरिकांनी सण उत्सव साजरा करताना कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार करू नये किंवा कायदा हातात घेऊ नये अशा प्रकारच्या सुचना पेण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांनी दिलेल्या असल्याने अनेक नागरिकांनी आपला सण, उत्सव उत्साहात पार पाडला असला तरी होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी काही किरकोळ तरुणाईवर कारवाई करण्याची वेळ पेण पोलिसांवर आली.





होळी आणि धुलीवंदन सण साजरा करताना पेण पोलिसांनी नाकाबंदी करून कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या ३२ वाहनांवर कार्यवाही केली असुन त्यांच्याकडून ३० हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. तसेच परशुराम म्हात्रे यांच्याकडून ३३१.१८ ग्रॅम वजनाचा गांजा मादक व नशाकारक पदार्थ असे एकूण सहा हजार रुपये किमतीचा गांजा देखील हस्तगत करण्यात पेण पोलिसांना यश प्राप्त झाले आहे.

# मंत्री आदिती तटकरेंच्या वाढदिवसानिमित्त अंगणवाडी विद्यार्थ्यांना खाऊवाटप

**पेण : प्रतिनिधी**

महिला व बालकल्याण मंत्री आदितीताई तटकरे ह्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त खारपाडा येथील राष्ट्रवादी काँग्रेस व कै मोरेश्वर भगत शैक्षणिक सामाजिक विकास संस्था खारपाडा यांच्या वतीने विदयार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

या वेळी कै मोरेश्वर भगत शैक्षणिक सामाजिक विकास संस्था अध्यक्षा तथा दुष्मी खारपाडा माजी सरपंच रश्मी भगत, राष्ट्रवादी काँगेस तालुका अध्यक्ष दयानंद भगत, ग्रा.सदस्य अनिता भगत, खारपाडा राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्ष मालती म्हात्रे, माजी उपसरपंच मीनाक्षी घरत, खारपाडा राष्ट्रवादी युवती अध्यक्ष मेघा पाटील, ज्येष्ठ नेत्या लता घरत, सीता पवार, वैशाली भगत, अंगणवाडी सेविका करुणा ठाकूर, रजनी भोईर, कीर्ती देसले मदतनीस सारिका पाटील सुरेखा घरत, कांचन मोकल आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी नामदार आदितीताई तटकरे यांना सर्वांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर कंटेनर उलटून नुकसान

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर मॅजिक पॉईंटजवळ एका वळणावर कंटेनर पलटी झाल्याची घटना घडली असून सुदैवाने यात चालक बचावला.

एक्स्प्रेस वेवरून पुण्याहून मुंबईकडे कंटेनर ट्रेलर चालक वासुदेव नामदेव कापसे (वय ४०, रा. रेवळकरवाडी, सातारा) हा मुंबईकडे माल घेऊन जातं असताना तो बोरघाटात मॅजिक पॉईंट आला असता चालकाचे कंटेनर वरील नियंत्रण सुटल्याने वळणावर पलटी झाला यात चालक थोडक्यात बचावला असून यात कोणतीही जीवित हानी झाली नाही, मात्र कंटेनरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



# श्रीवर्धनच्या धूलिवंदनाची अनोखी परंपरा

## पारंपरिक ढोलाच्या गजरात भावंडांची दिव्य भेट

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनमध्ये धूलिवंदनाच्या दिवशी गेल्या कित्येक वर्षांपासून एक अत्यंत खास आणि अनोखी परंपरा पाळली जात आहे. या दिवशी सायंकाळी श्री कालभैरव आपल्या मोठ्या भगिनींना, कुसुमादेवी आणि सोमजादेवी यांना भेटीसाठी आमंत्रित करतो. यासाठी ढोल व वाद्यांच्या गजरात एक विशिष्ट धार्मिक कार्यक्रम आयोजित केला जातो.



दरवर्षी होळीच्या सणाच्या दिवशी, ढोल वाजवत, श्री भैरवनाथाचया वेशीवर कुसुमादेवी व सोमजादेवी यांना भेटीसाठी आमंत्रित करण्याची परंपरा कायम राखली जाते. श्रीवर्धनमध्ये ही परंपरा आजही अत्यंत श्रद्धेने आणि उत्साहाने साजरी केली जाते.

कुसुमादेवी आणि सोमजादेवी यांचे देवस्थान श्रीवर्धनपासून थोडं अंतरावर असलेल्या जंगल क्षेत्रात आहे. मात्र, दोन भगिनींना श्री भैरवनाथाच्या वेशीवर भेटीला येण्याचे निमंत्रण देण्यासाठी ढोलाच्या गजरात शंभर वर्षांची परंपरा पाळली जाते. विशेष म्हणजे या वेळेस कुसुमादेवी व सोमजादेवी यांच्या मंदीरांतील गुरव आणि भक्त यांनी ढोल वाजवत भैरवनाथाच्या वेशीवर जाऊन त्याच्या स्वागतासाठी आरती केली जाते.

या आकर्षक आणि भक्तिमय परंपरेची सुरूवात पेशवेकालात झाली होती. श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या काळात या सणांचे आयोजन मोठ्या धूमधामाने होत होते, आणि मुरुड-जंजिरा संस्थानच्या नवाबांकडून यासाठी अनुदान दिले जात होते. त्यानंतर मापुस्कर कुटुंबाने या परंपरेला जपले आणि आज अजित मापुस्कर यांच्या पुढाकाराने ही परंपरा सुरू आहे.

प्रत्येक वर्षी धूलिवंदनाच्या सायंकाळी श्रीवर्धनमध्ये मोठ्या प्रमाणात लोक एकत्र येतात. येथे पर्यटक, स्थानिक लोक, चाकरमनी, आणि श्रद्धाळू भक्त सर्वजण सामील होतात. कार्यक्रमाच्या शेवटी, ढोलांच्या गजरात, एकमेकांवर गुलाल उधळला जातो आणि भक्तिमय वातावरण निर्माण होते.

आजही श्रीवर्धनच्या या परंपरेचे महत्त्व कायम आहे आणि भविष्यातही ही परंपरा चांगल्या प्रकारे जपली जाईल, असे स्थानिक समाजाच्या आणि देवस्थानच्या व्यवस्थापनाने सांगितले आहे.

# गोरगरीब आदिवासी व अनाथांची होळी झाली गोड

## प्रबोधन स्पर्धा, पुरणपोळ्यांसह शैक्षणिक साहित्य व साड्यांचे वाटप

**पाली : प्रतिनिधी**

होळीचा सण रायगड जिल्ह्यात विधायक पद्धतीने साजरा करण्यात आला. अनेक सामाजिक व स्वयंसेवी संस्था तसेच दानशूर व सुज्ञ नागरिक आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) यांच्या माध्यमातून होळीमध्ये जाणाऱ्या असंख्य पुरणपोळ्या आदिवासी वाडी, गरीब आणि अनाथांना वाटण्यात आल्या. याशिवाय, काही ठिकाणी स्पर्धा व प्रबोधन कार्यक्रम, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच साड्यांचे वाटप करण्यात आले.

होळी लहान करू या, पोळी दान करू या' या कार्यक्रमाच्या पाठीमागे सुद्धा राष्ट्रीय संपत्तीचे होणारे नुकसान टाळणे व पर्यावरणाचे प्रदूषण थांबवणे हा उद्देश आहे. हा उद्देश सफल करण्यासाठी ठिकठिकाणी विधायक उपक्रम राबविण्यात आले. होळी लहान पोळी दान या उपक्रमाला अनेकांची साथ मिळत आहे. या माध्यमातून गोरगरिबांप्रती असलेली भावना आणि समाजसेवेची ओढ अतिशय प्रेरणादायी आहे. अशा प्रकारे सण साजरे करणे हे समाजातील एकता आणि सेवाभावाचे एक उत्तम उदाहरण आहे.

पोळी करा दान या उपक्रमात या वर्षी पाली, आगर आळी, भोईआळी, उंबरवाडी, झाप, बुरमाळी, छत्रपती संभाजी महाराज चौक, कासार आळी, ओसवाल प्लाझा, कुंभार आळी, राम आळी, मधली आळी, शिक्षक कॉलनी रोहिदास नगर, बल्लाळेश्वर नगर, धूंडी विनायक नगर, देऊळवाडा, सोनार आळी, खडक आळी आणि पालीतील लहान मोठ्या होळ्या येथून जवळपास ७०० पुरणपोळ्या जमा करण्यात आल्या. याशिवाय, फळे आणि पापड फेण्याही वाटपासाठी गोळा करण्यात आल्या.

अमित निंबाळकर आणि रोशन रुईकर यांनी होळ्यांवरून पोळ्या जमा करण्याचे काम केले. शुक्रवारी (ता. १४) संदीप महाडिक, दत्तात्रय सावंत, संदेश सोनकर, किशोर चौधरी, अमित निंबाळकर, रोशन रुईकर आणि इतर सहभागींनी सफाई व वाटपाचे काम पाहिले. तालुक्यातील तळई, दापोडे, झापवाडी, सोसायटी वाडी रासल व गोमारी आदी आदिवासी वाड्या व टेंभी वसाहत येथे पुरणपोळ्या, फळे व पापड फेण्या वाटण्यात आल्या.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पेण शाखा गेली अनेक वर्षे होळी लहान पोळी दान हा उपक्रम राबवत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश होळीच्या सणाच्या दिवशी गरिबांना पुरणपोळ्या वाटून त्यांचे तोंड गोड करणे हा आहे. या पुरणपोळ्या वृद्धाश्रम, अनाथाश्रम व दुर्गम भागातील आदिवासी वस्त्यांमध्ये वाटल्या जातात. यावर्षी अंकुर अनाथ आश्रमाला पुरणपोळी भेट देण्यात आल्या.

### महिलांना साडीवाटप

महा. अंनिस तर्फे अलिबाग तालुक्यातील बामण सुरे येथे व्यसनाचे दुष्परिणाम व पर्यावरणाचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात १०० पुरणपोळ्या वाटल्या गेल्या, मुलांना वही आणि पेन वाटप करण्यात आले. तसेच अंगणवाडी मदतनीस महिलांना साडी देण्यात आल्या. सुरभी स्वयंसेवी संस्थेने चित्रकला स्पर्धा आयोजित केली आणि मुलांना बक्षिसे व प्रशस्ती पत्रके दिली. या कार्यक्रमात निर्मला फुलगावकर, सुभाष पानस्कर, आर्यक फुलगावकर, नितीन राऊत, सुप्रिया जेधे, श्रद्धा शाह, सुनीता तारे, संध्या कुलकर्णी, मोहन मिठागरे, वासंती मिठागरे, शांताराम राऊत, बिभीषण जेधे, इम्तियाज खान, धीरज जेधे आणि वंदना नाईक यांनी सहभाग घेतला.

### गरजूंना कपड्यांचे वाटप

रोहा अंनिस च्या वतीने कोलाड येथील एका वृद्धाश्रमात जाऊन बेघर आणि अबाल-वृद्धांसोबत रंग खेळण्यात आले. त्यांच्यासोबत होळी साजरी करून पुरणपोळीचे वाटप करण्यात आले. माणुसकी डॉट कॉम या सेवाभावी संस्थेच्या वतीने जुन ते सोन हा उपक्रम गेल्या आठ वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे. यावर्षीही एका वाडीवर जाऊन गरजूंना कपडे आणि खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून समाजातील गरजूंना मदत करण्याचा संदेश देण्यात आला.

Wild Life Rescue Team Raigad यांच्या वतीने होळीच्या दिवशी एक अनोखा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात होळीला अर्पण करण्यासाठी फळे घेऊन येणाऱ्या माता-भगिनींना नम्र आवाहन करण्यात आले की, फळे होळीत अर्पण करण्याऐवजी ती एका बॉक्समध्ये ठेवावीत. या फळांना प्राण्यांना खाऊ म्हणून वाटप करण्यात आले. या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला या उपक्रमांचे आयोजन अनिकेत पाडसे, दत्तात्रेय शेडगे, प्रमोद उपक्रमांतून समाजातील विविध वर्गांना जोडून समाजसेवा आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला.

> **होळी करा लहान पोळी करा दान हा उपक्रम अनेकांनी उत्स्फूर्तपणे अवलंबला आहे. बहुतांश होळी मंडळे आणि रोटरी क्लब सारख्या संस्था स्वतः पुरणपोळ्या वाटप करू लागल्या आहेत. ही एक चांगली आणि स्वागतार्ह बाब आहे. जो विचार फक्त आमचा होता तो आता आपल्या सर्वांचा झाला आहे. होळी सणाच्या या विशेष प्रसंगी, समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन गरिबांना आनंद आणि आशेचा संदेश दिला आहे. हा उपक्रम समाजातील सर्व घटकांच्या सहभागाने यशस्वी झाला आहे.**
>
> **-संदेश गायकवाड, सदस्य, अंनिस शाखा पेण**



# चिंचबा देवींच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**मुरुड : प्रतिनिधी**

बोर्ली पंचतन येथील होळीचे पटांगण या ठिकाणी चिंचबा देवीचे मोठे मंदिर असून येथे दरवर्षी होळी संपल्यावर किमान सात दिवस या देवीचे दर्शन घेण्यासाठी विविध भागातून लोक दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी करीत असतात.



बोर्ली पंचतन येथे एक गाव एक होळी अशी परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. होळी दहन झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता देवीच्या मूळ मंदिरातून पालखी मिरवणूक निघते. सदरची पालखी मिरवणूक ही गावातील प्रत्येक भागात संपूर्ण फिरते.गावातील लोक पालखीचे दर्शन घेतात.संपूर्ण दिवस पालखी गावात फिरल्यावर पुन्हा देवी मूळच्या ठिकाणी विराजमान होते. देवी विराजमान झाल्यावर भक्त गण मोठ्या संखेने दर्शनासाठी येत असतात.

या पालखीबरोबरच पारंपरिक पद्धतीने सुरू असलेला राधेचा खेळ व नंतर राधेची पूजा केली जाते.देवीची पालखी गावातून फिरते त्या वेळी असंख्य महिला उपवास करतात तसेच पालखीच्या मार्ग महिला दूधाने शिंपडतात. सात दिवस होळीच्या नाट्यगृहामध्ये विविध प्रकारचे म्हणजेच नाटक, ग्रुप डान्स व अन्य करमणूक कार्यक्रम होतअसतात. शेवटच्या रात्री येथे अखंड आगरी समाज बोर्ली पंचतन यांचे म्हशाचे सोंग हा कार्यक्रम होतो. या वेळी देवीची विविध रूपे साकारली जातात. सात दिवस पूर्ण झाल्यावर होळीच्या मंदिरातून पालखी मिरवणूक काढली जाते. गावातील चौकाचौकात या पालखीची पूजा-अर्चा केली जाते. बोर्लीमधील रहिवासी व पंचक्रोशीतील देवीभक्त या दिवशी बालय गो डिंगलाय या घोषवाक्याने गुलाल उधळून देवीचा जल्लोष करतात.

या होलिकोत्सवामध्ये कोणीही वादविवाद न करता देवीच्या चरणी नतमस्तक होऊन भक्तीभावाने पूजा-अर्चा करण्यात मग्न होत असतात. या सात दिवसांत मुंबई, पुणे, सांगली, रायगड, कल्याण, ठाणे येथून देवीचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने येतात.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E- TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | E-Tender No.& Description of work | Due Date & Time (Hrs) for submission & opening of Tender |
|---|---|---|
| | E Tender No. EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten- /25-26 | |
| 1 | SE/EHV (O&M)/cir/PNL/e-Tender 01/2023- 24 **RFx No. 7000035725** E Tender for Hiring of LMV (Maruti Suzuki Swift Dzire-Tour, Hyundai Xcent, etc. or equivalent) for The Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar for the period from 01.04.2025 to 31.03.2026 | **Download of Tender document date:** 11.03.2025 at 18:30 Hrs to 25.03.2025 at 10:59 Hrs |

| Sr. No. | Estimated cost (Rs.) | EMD (Rs.) | Tender Fee(Rs.) | Closing date | Technical opening date | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Limited to Rs.6,00,000/- ( including GST) | Rs.6,000/- | Rs.525/- | 25.03.2025 at 10:59 Hrs | 25.03.2025 at 11:00 Hrs | 25.03.2025 at 15:00 Hrs |

For further details visit our website https://srmetender.mahatransco.in
Contact Person : The Executive Engineer (Adm), Mobile No.9167006557
Note : All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL

SD/-
**Executive Engineer, 400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

# नवी मुंबई होणार आर्थिक केंद्र

## नवी मुंबईसह खारघरमध्ये विकास केंद्र | आंतरराष्ट्रीय बाजाराचीही स्थापना

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई महानगर प्रदेश आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र अर्थात ग्रोथ हब म्हणून विकसीत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याच अनुषंगाने नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पात ठाणे जिल्ह्यात नवी मुंबई आणि खारघर या दोन ठिकाणी विकास केंद्रांची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली आहे. सोबतच नवी मुंबईत महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार स्थापन केला जाणार आहे. रोजगार वाढीसह येथील विकासाला यामुळे चालना मिळणार आहे.



निती आयोगाच्या शिफारशीनुसार मुंबई महानगर क्षेत्राला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसीत केले जाणार आहे. एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहेत. रोजगार, परवडणारी घरे यांच्यासह उद्योग, वाणिज्य केंद्र अशा विविध प्रकल्पांची उभारणी या अंतर्गत केली जाणार आहे. त्याच धर्तीवर मुंबई महानगर प्रदेशातील ठाणे जिल्हा आणि पर्यायायने नवी मुंबई हे मोठे आर्थिक केंद्र म्हणून पुढे येणार आहे. काही दिवसांपूर्वी याच पार्श्वभूमीवर लॉजिस्टीक पार्कची घोषणा करण्यात आली. यात भिवंडीत हे पार्क उभारले जाणार आहे. सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर झालेल्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सात आर्थिक विकास केंद्र विकसीत करण्याची घोषणा केली. यात ठाणे जिल्ह्यातील नवी मुंबई आणि खारघर या दोन शहरात हे केंद्र उभारले जाणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून यापूर्वीच विकास केंद्राची घोषणा करण्यात आल होती. राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या ठाणे जिल्ह्यातील आणि विशेषतः नवी मुंबईतील या केंद्रांमुळे अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे.

पायाभूत सुविधांच्या उभारणीमुळे या भागात आंतरराष्ट्रीय कंपन्या कार्यरत आहेत. नवी मुंबईतच जेम्स ॲंड ज्वेलरी पार्कची उभारणी केली जाते आहे. सुमारे एक लाख रोजगारांची निर्मिती करणार्या अशा प्रकल्पांमुळे नवी मुंबई नवे आर्थिक केंद्र ठरणार आहे. मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स अर्थात बीकेसीच्या धर्तीवर खारघर येथे व्यावसायिक कॉर्पोरेट पार्कची उभारणी केली जाते आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे या पार्कला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होणार आहे. त्याच अनुषंगाने राज्य सरकराने आता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय बाजार स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

मुंबईपासून नवी मुंबई आणि परिसराचे नव्या अटल सेतू आणि किनारी मार्गामुळे कमी झालेले अंतर, परिसरात सुरू असलेल्या नव्या जोड रस्त्यांची कामे, जवाहरलाल नेहरू बंदर न्यास ते बडोदे महामार्ग, मेट्रो मार्गिका अशा वाहतुकीच्या पर्यायांमुळे या नव्या आर्थिक विकास केंद्र आणि आंतरराष्ट्रीय बाजार याच्यासह इतर प्रकल्पांच्या उभारणीला बळ मिळणार आहे.

# आग्रोळी गावातील पार्किंग धोकादायक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या लोकसंख्ये बरोबरच येथील वाहनांची संख्याही वाढत आहे, परंतु त्या प्रमाणात वाहन पार्किंगची सुविधा नसल्याने शहरात वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नवी मुंबईतील आग्रोळी गावातील समाज मंदिराशेजारी होणारी पार्किंग ग्रामस्थांसाठी धोकादायक बनली आहे.

शहरात पार्किंग अभावी वाटेल तेथे वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीचे नियोजन बिघडले आहे, असाच प्रकार आग्रोळी गावातील समाज मंदिरा शेजारी पहायला मिळत आहे. या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूला बेशिस्त पार्किंग असल्याचे निदर्शनास येते. ही पार्किंग अपघाताला निमंत्रण देत आहे. ही पार्किंग हटविण्याची मागणी ग्रामस्थाकडून होऊ लागली आहे.

मागील काही महिन्यापासून अग्रोळी गावातील उड्डाणंपूलाखाली असणाऱ्या समाज मंदिरा शेजारी असणाऱ्या रहादरीच्या मार्गांवर बिनधास्तपणे वाहने पार्किंग केली जातात. या ठिकाणी होणारी वाहन पार्किंग ही आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांन कडून होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. पार्किंगच्या जागेसाठी सध्या बहुतांश ठिकाणी स्पर्धाच सुरु असल्याचे पहाव्यास मिळत आहे. पार्किंगला जागा नसल्याने जिथे जागा मिळेल तिथे वाहन पार्किंग केली जाते. ब्रिज वरून अग्रोळी गावात प्रवेश करतानाच ही बेकायदा दुतर्फा वाहन पार्किंग दृष्टीत पडते.



ही वाहन पार्किंग अपघाता साठी धोक्याची घंटा ठरू लागली आहे. दोन दिवसांपूर्वी ह्याच ठिकाणी दोन अपघाताच्या घटना घडल्या सुदैवाने या जबर अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नाही तसेच कायम या ठिकाणी किरकोळ अपघात होत असतात. दिवसेंदिवस या ठिकाणी वाहन पार्किंग करणाऱ्या वाहनाची संख्या वाढू लागली आहे. बेशिस्त वाहन पार्किंगमुळे ब्रिज वरून गावात प्रवेश करताना शक्यतो समोरून येणारे वाहन या बेशिस्त पार्किंग मुळे कधी दिसत नाही तर कधी त्यांच्या वेड्या वाकड्या पार्किंग मधून वाहन काढतांना देखील अपघात होतात.

याठिकाणी दुचाकी, चार चाकी, टेम्पो अशी वाहने रोज पार्किंग केली जात आहेत. रस्त्यावर दोन्ही बाजूला बेकायदा पार्किंग दिसून येते.या बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक नियोजन ढासळले आहे. त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूककोंडी होत आहे. या ठिकाणी थेट पदपथावर वाहने उभी केली जात असल्याने पादचाऱ्यांची गैरसोय होत आहे. त्याकडे संबंधित विभागाचे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येनुसार सिडको आणि महापालिकेने वाहन पार्किंगचे नियोजन करणे गरजेचे आहे.

> **नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात बेकायदेशीर पार्किंग केलेल्या वाहनांवर कारवाई सुरूच असते. संबंधित ठिकाणी कारवाई करण्याचे आदेश त्वरित देतो.**
> **-पुरुषोत्तम कराड, उपायुक्त, नवी मुंबई पोलीस वाहतूक विभाग**

# फुलन शिंदे यांना पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई सीवूड्समधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या फुलन शिंदे यांना महाराष्ट्र शासनाचा ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रदान करण्यात आला. कोकवलं विभागातून त्यांची निवड करण्यात आली.



उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल व आमदार छगन भुजबळ यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. फुलन शिंदे या नवी मुंबईत सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहिल्या आहेत. आदिवासी आश्रमशाळेला मदत, दिव्यांग मुलांच्या शाळेला मदत अशी विविध सामाजिक कामे केली आहेत. गेली सहा वर्षे समता महिला मंडळाच्या माध्यमातून महिलांसाठी उपक्रम राबवत आहेत.

महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध प्रकारे त्या व्यासपीठ उपलब्ध करून देत असतात. त्यांच्या महिला सबलीकरणाच्या उपक्रमांतून त्यांनी अनेक व्यावसायिक महिला घडविल्या आहेत.

# संत तुकाराम बीजनिमित्त आध्यात्मिक वाचन

**नवी मुंबई : बातमीदार**

संत तुकाराम बीज निमित्त इंदिरा नगर, तुर्भे येथे विशेष वाचन आणि अध्यात्मिक प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संत तुकाराम महाराजांचे चरित्र विद्यार्थ्यांकडून वाचून घेण्यात आले आणि त्यांच्या जीवन कार्याचा सखोल अभ्यास करण्यात आला.

या वेळी सचिन माधव चिलमे, विद्यार्थी अक्षय बेळे, वैष्णवी बनसोडे, अरहान पठाण, प्रिया बनसोडे, ऋणाली तुपे, सौम्या गौतम, कार्तिक निंबाळे, मोहित कुसळकर, रोहित कुसळकर आदी विद्यार्थी उपस्थित होते.



या उपक्रमात विद्यार्थ्यांना संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा तसेच हरिपाठाचा अर्थ समजावून सांगण्यात आला. विद्यार्थ्यांना संत वाङ्मयाची गोडी लागावी, त्यातून जीवनातील आदर्श मूल्ये आत्मसात करता यावीत, यासाठी हरिपाठ, हनुमान चालीसा, रामरक्षा आणि अन्य धार्मिक ग्रंथांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थिमित्र सचिन माधव चिलमे (लातूरकर) यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांना संत तुकाराम महाराजांचे सामाजिक कार्य, त्यांनी समाजमनावर टाकलेला प्रभाव आणि त्यांच्या अभंगांचा अर्थ समजावून सांगितला.

या वेळी विद्यार्थ्यांनी तुकाराम गाथेतील निवडक अभंग वाचले आणि त्यावर चर्चासत्र घेतले. तसेच संत साहित्याचा अभ्यास करून आधुनिक जीवनात त्याचा उपयोग कसा करता येईल, यावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक विचारसरणी रुजवण्यास मदत झाली असून संत साहित्याच्या अभ्यासाची गोडी निर्माण झाली. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि भविष्यात असेच उपक्रम आयोजित करण्याची मागणी केली.

# नेरूळच्या ज्येष्ठ नागरिक संघात महिला दिन

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नेरुळ येथील ज्येष्ठ नागरिक संघ संस्थेचा जागतिक महिला दिन सोहळा गुरुवारी (दि.१३) संस्थेच्या श्री गणेश सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा झाला. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राज्य सरकार पुरस्कार विजेत्या फुलन शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या डॉ. वृषाली मगदूम, साहित्यिक सुनंदा भोसेकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर आदी मान्यवर विचार मंचावर उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे उपस्थित राहून सहभाग दर्शविला. प्रसंगी विविध क्षेत्रात योगदान दिलेल्या महिलांचा हिरकणी पुरस्कार २०२५ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



दीप प्रज्वलन आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून सुरू झालेल्या या कार्यक्रमात अपर्णा दाबके यांच्या सहकाऱ्यांनी स्वागत गीत व प्रार्थना म्हटली. त्याचप्रमाणे नंदलाल बॅनर्जी यांच्या शंखनादाने वातावरण अधिक मंगलमय झाले. आपल्या प्रास्तविक भाषणात अरविंद वाळेकर यांनी महिलांच्या चळवळीला ५० वर्षे झालेली आहेत, असे नमूद करून ज्येष्ठ नागरिक संघ करीत असलेल्या कार्याविषयी उपस्थितांना माहिती दिली.

उपस्थितांशी संवाद साधताना वृषाली मगदूम यांनी गेल्या पन्नास वर्षात स्त्रियांच्या झालेल्या चळवळीचा आढावा घेतला. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले तसेच फातिमा शेख या भारतीय पहिल्या महिला शिक्षकांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख करून भंवरी देवी, बिलकिस बानू तसेच निर्भया केस यांचा आपल्या भाषणात उल्लेख केला. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक संघाने विविध क्षेत्रात योगदान दिलेला महिलांचा हिरकणी पुरस्कार- २०२५ देऊन त्यांनी सत्कार केला.

हिरकणी पुरस्कार प्राध्यापिका प्रतिभा सराफ, (साहित्य), मनीषा वळकुंडे, (व्यसनमुक्ती), रेहान पटेल राणे, (कलाक्षेत्र), कमल आंगणे (वैद्यकीय क्षेत्र), सुवर्णा मिसाळ, (शैक्षणिक क्षेत्र), बाला सिताराम रोकडे, (क्रीडा क्षेत्र), बिना भरत साळेकर, (सामाजिक कार्य), रुक्मिणी जोसेफ पॉल, (स्वच्छता दूत) लता शिरसाट, (पोस्ट वूमन) यांना अनुक्रमे देण्यात आला. उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळाच्या माध्यमातून रेखा वाळवेकर यांनी जे अनमोल सामाजिक कार्य केले या कार्याचा उचित गौरव त्यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन करण्यात आला. वेळी रणजीत दीक्षित यांनाही वाढदिवसाच्या निमित्ताने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर गुमास्ते यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. फुलन ज्योतिराव शिंदे यांनी महिलांच्या प्रगतीचा आढावा घेतला. सूत्रसंचालन रजनी कलोसे व अजय माढेकर यांनी केले. आभार विकास साठे यांनी मानले.

# सन २०००च्या पोलीस बॅचचे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

सन २००० साली महाराष्ट्र शासनामधील नवी मुंबई पोलीस दलात निवड झालेल्या पोलीस बॅचच्या टीमला यंदाच्या वर्षी २५ वर्षे पूर्ण झाले, परंतु हे रौप्य महोत्सवी वर्ष त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत साजरे केल्याने त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.



या टीममध्ये १४० म्हणजेच मुली १६ खंडाळा पीटीएस तर मुले १२४ मरोळ पीटीएस, मुंबई या ठिकाणी प्रशिक्षण घेतले.९ महिन्याची खडतर ट्रेनिंग आणि कायद्याचे ज्ञान तसेच विविध आयुध आणि शस्त्रास्त्रांचा अभ्यास करून एक परिपूर्ण पोलीस म्हणून कर्तव्यावर रुजू झाले. आपोआपच त्यांच्यातील प्रशिक्षणातील सर्व अभ्यासक्रमांचे प्रत्यक्ष अंमलबजावणी करायचा नकळत वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला कामाची सुरुवात झाली. तेव्हापासूनच ते गेट-टुगेदर च्या माध्यमातून ते वर्षातून ६ मार्च भरती तारखेच्या आसपास दरवर्षी भेटत राहतात.

दरम्यान, कामाचे स्वरूप खूपच तणावपूर्ण आणि जबाबदारीचे होत गेले अशातच त्यांच्यामधील तीन मित्रांचे अवकाळी देहावसन देखील झाले. त्यांच्यातील १० ते १२ स्पर्धा परीक्षा पूर्ण करून अधिकारी पदावर रुजू झाले आणि आज ते अधिकारी म्हणून कार्यरत आहे. त्यांना गेट-टुगेदर च्या माध्यमातून भेटतच राहिलो. सन २०२५ हे रौप्य महोत्सवी पंचविसावे वर्ष असल्याने आम्ही सहकाऱ्यांसोबत विचार मंथन करून आगळ्यावेगळ्या स्वरूप द्यायचं असे ठरवले आणि त्यानुसार त्यांनी गोशाळा आसुडगाव, खांदा कॉलनी, पनवेल येथील गोमातेला सुयोग्य हिरवा चारा अन्नदान म्हणून जाऊन स्वतः दिला. त्याच दिवशी दुपारी टाटा हॉस्पिटल खारघर या ठिकाणी काही ठराविक मित्र जमले आणि रक्तदान केले. संध्याकाळी पुन्हा एकदा एकत्र बालग्राम अनाथ आश्रम खांदा कॉलनी, पनवेल येथील मुलांना त्यांच्या नवी मुंबई २००० बॅच कडून एक दिवसांचे रुचकर जेवण अन्नदान म्हणून देऊन स्वतः त्यांच्यासोबत जेवले. संपूर्ण दिवसाचे समाधान म्हणजे त्यांच्या मनाला एक सुखद अनुभव होता जो फक्त त्यांनी नोकरी, मैत्री आणि एकत्रित जमण्याच्या माध्यमातून पार पाडू शकले.

कार्यक्रमाची सांगता होत होत प्रत्येकाला पुन्हा आपल्या नोकरीसाठी कुटुंबाकडे जाण्याची वेळ आली आणि सगळेजण २०२५ च्या रौप्य महोत्सव कार्यक्रमाची सांगता करून आपापल्या घरी रवाना झाले, परंतु यावर्षी झालेला आमचा गेट-टुगेदर हा आम्ही समाजासमोर आदर्श ठेवून एक अविस्मरणीय कार्यक्रम साजरा केला.



**पनवेल : नव्याने इंद्रायणी इमेजिंग सेंटर आणि पॅथलॅब्स हे सतिश उगीले यांनी खांदा कॉलनी सेक्टर १मध्ये सुरू केली आहे. या सेंटरचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी त्यांनी सतिश उगीले यांच्यासह त्यांच्या संपुर्ण टीमचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. उद्घाटनावेळी पीडब्लूडी विभागाचे माजी मुख्या अभियंता एकनाथ उगीले, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप नेते भीमराव पोवार, डॉ. सुरज उगीले, डॉ. देवेंद्र पाटील, डॉ. केदार कुटे, डॉ. सचिन मुराडे, डॉ. अग्रवाल, डॉ. नीलिमा खाचने, डॉ. पूर्वा पाटील आदी उपस्थित होते.**

# पत्रकारांना अपघात विम्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघटनेच्या सदस्यांना तुकाराम बीजचे औचित्य साधून अपघात विम्याचे वाटप रविवारी (दि.१६) शासकीय विश्रामगृह, पनवेल येथे करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे सत्य संस्कृती चारिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष मोहन जोशी, नीरज पांडे, ललित सिंग मेहता उपस्थित होते.



पनवेल-नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघटनेचे अध्यक्ष मयुर तांबडे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि गतवर्षी राबवलेल्या उपक्रमाविषयी माहिती दिली. संस्थेने गतवर्षी ३३ सायकल वाटपाचा कार्यक्रम, धामोळे वाडी येथे विद्यार्थ्यांना खाऊ आणि ब्लॅंकेट वाटप केले होते. यावर्षी दुसऱ्यांदा मयुर तांबडे यांची अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर पत्रकार संघटनेच्या सदस्यांना पाच लाखांच्या अपघात विम्याचे वाटप करण्यात आले. पत्रकार हा समाजाचा आरसा असल्याने नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि बातम्यांसाठी इतरत्र फिरावे लागते.

बऱ्याचदा अपघात झाल्यास जवळ पैसा नसल्याने त्याला अडचण निर्माण होते. त्यामुळे संघटनेच्या सदस्यांचे अपघात विमा काढण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली. आगामी काळात गरीब, गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप करण्यात येणार असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

या वेळी उपाध्यक्ष दीपक कांबळे, सचिव लालचंद यादव, खजिनदार मिलिंद खारपाटील, अशोक गोरडे, दीपक जगे, समीर वेशवीकर, पंकज तांबडे, पत्रकार अनिल कुरघोडे, अण्णासाहेब आहेर उपस्थित होते. या वेळी मोहन जोशी यांनी पत्रकार संघटनेने राबवलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# खालापूरकरांची पाण्यासाठी वणवण

## दैनंदिन वापराचे पाणी आणण्यासाठी कसरत



> नवीन तेवीस कोटींची पेयजल योजना खालापूरसाठी मंजूर झालेली आहे. सोमवारी थांबलेले काम सुरू करण्यात येईल तसेच पाताळगंगा नदीवर सुरू असलेल्या योजनेसाठी तातडीने नवीन पंप खरेदी करून थेट नदीपात्रातून पाणी उचलून विहित घेऊन पाणीपुरवठा करण्यासाठी सूचना देऊ.
> **–रोशना मोडवे, नगराध्यक्ष, खालापूर नगरपंचायत**

> पाणीपुरवठा सारख्या गंभीर प्रश्नावर नगरपंचायत गंभीर नाही. प्रशासन भ्रष्ट झालेले असून कोणाचा अंकुश नाही. एकीकडे भरमसाठ पाणीपट्टी वाढवायची आणि दुसरीकडे नागरिकांना पाणी आणण्यासाठी विहिरीवर पाठवायचे असा अजब प्रकार सुरू असून अशी नगरपंचायत बरखास्त करा.
> **–ॲड. राकेश गव्हाणकर**

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्याचे ठिकाण असतानादेखील पिण्याचे शुद्ध पाणी दूरच दैनंदिन वापरासाठीदेखील पाणी वेळेवर मिळत नसल्याने खालापूर, शहरातील नागरिक वैतागले आहेत.

दुष्काळात तेरावा महिना अशी गत सध्या खालापूर शहरात आहे. पर्यायी जल योजना पाताळगंगा नदीवर असून रसायन मिश्रित आणि मांगुर तलावाचे दुर्गंधीयुक्त पाणी नागरिक नाईलाजास्तव दैनंदिन कामासाठी वापरतात, परंतु पाताळगंगा नदिची पाणी पातळी कमी झाल्याने दैनंदिन वापराचे पाणीदेखील चार ते पाच दिवस मिळत नाही.

नगरपंचायत खालापूर शहरासाठी नवीन जलवाहिनीचे सुरू झालेले काम आठ महिने ठप्प असून ठेकेदाराला कामाचा विसर पडल्याने नगरपंचायत प्रशासनाने आठवण करून द्यावी, अशी मागणी नागरिक करत आहेत. सध्या पाच दिवसांपासून खालापूरचा पाणीपुरवठा ठप्प झाला असून

पिण्यासाठी जारमधील विकतचे पाणी वापरावे लागत आहे. तर दैनंदिन कामासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी नदि आणि विहिरीची वाट धरावी लागत आहे. खालापूर नागरिकांच्या पाणी टंचाई समस्येवर नगरपंचायत प्रशासन, सत्ताधारी नगरसेवक गांभीर्याने पाहावे, अशी मागणी खालापूर नागरिक करीत आहेत.

### ▌जलवाहिनीचे काम झाल्यावर समस्या मार्गी

*कलोते येथून नवीन जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यास नागरिकांची तहान भागणार आहे. पिण्याच्या पाण्याचे प्रचंड हाल होत आहेत. असे असतानादेखील पाणीपट्टी दुप्पट करण्यात आली आहे.*

# विविध कृषी पुरस्कारांसाठी प्रस्तावाबाबत आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत सन–२०२३ या वर्षांमध्ये कृषी व संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती, गट, संस्थाकडून विविध कृषी पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात येत असून जास्तीत जास्त शेतकरी, गट, संस्था, व्यक्तींनी विविध कृषी पुरस्कार प्रस्ताव नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रायगड–अलिबाग वंदना शिंदे यांनी केले आहे.

राज्यात कृषी आणि संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरीता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच कृषी विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, संस्था, गट यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार, जिजामाता कृषीभूषण पुरस्कार, सेंद्रीय शेती कृषीभूषण पुरस्कार, उद्यानपंडीत पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार व कृषी विभागामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येते. विविध कृषी पुरस्कार प्रस्ताव तयार करण्याकामी अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**रेवदंडा : गोवा मुक्ती संग्रामात झोकून देत प्राणार्पण केलेले शेषनाथ वाडेकर यांचे हुतात्मा स्मारक कोएसो हायस्कूलनजीकच्या मैदानात आहे. स्मारकासभोवती मातीचा भराव टाकल्यास या स्मारकाला नवसंजीवनी मिळेल, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत तसेच सभोवताली कुंपण अथवा संरक्षित भिंत घालणे गरजेचे आहे.**

# मंत्री आदिती तटकरे यांचा सुतारवाडीत वाढदिवस




**पेण : प्रतिनिधी**

राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांचा वाढदिवस पेण तालुका राष्ट्रवादी काँगेस तर्फे सुतारवाडी येथे केक कापून साजरा करण्यात आला.

या वेळी पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, पेण तालुका अध्यक्ष दयानंद भगत, जिल्हा उपाध्यक्ष उदय जवके, जिल्हा ओबीसी सेल उपाध्यक्ष यशवंत घासे, कै मोरेश्वर भगत शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्ष माजी सरपंच रश्मी भगत, ग्रा.सदस्य अनिता भगत, राष्ट्रवादी काँग्रेस खारपाडा महिला अध्यक्ष मालती म्हात्रे, महिला उपाध्यक्ष जयश्री पाटील, अवंतिका म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस गंगाधर पाटील, पेण विधानसभा सचिव प्रभाकर लांगी, अपंग प्रहार संघटना अध्यक्ष भालचंद्र भगत, वाहतूक सेल अध्यक्ष राजू मानकवळे, तालुका युवक उपाध्यक्ष कैलास रुठे, सुदर्शन पाटी, प्रदीप म्हात्रे, प्रभाकर निगावाले, अशोक डगर शेखर पाटील आदी उपस्थित होते.

# नांदगावकर, धोंडसेकर यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

उसरोली गावचे सदस्य आत्माराम नांदगावकर यांची मुरूड तालुका चर्मकार प्रतिष्ठान अध्यक्षपदी व प्रणय गो. धोंडसेकर यांची संघटक म्हणून निवड झाल्याबद्दल धुलीवंदनाचे औचित्य साधून उसरोली चर्मकार समाजाच्या वतीने अध्यक्ष यांचे सत्कार उसरोली समाजाचे अध्यक्ष प्रणय धोंडसेकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच संघटक म्हणून निवड झालेले धोंडसेकर यांचे सत्कार समाजाचे उपाध्यक्ष उमेश पेणकर यांच्या हस्ते करण्यात आला.

श्री संत शिरोमणी महिला मंडळ यांच्या वतीने हर्षा नांदगावकर यांनी दोघांचे अभिनंदन केले. आत्माराम नांदगावंकर आपल्या भाषणात म्हणाले माझ्यावर विश्वास ठेवून समाजाची उन्नती करण्यासाठी जी धुरा हाती दिलेली आहे ती मी तुम्हा सर्वांना सोबत घेऊन कर्तव्यनिशी पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन अशी ग्वाही मी आज समाजापुढे देत आहे.

या कार्यक्रमासाठी समाजाचे खजिनदार मंगेश नांदगावकर, सुरेश मुरुडकर, सदाशिव पाब्रेकर, मंदार नांदगावकर अशोक म्हशीलकर, सुमित पेणकर, हिरामण नांदगावकर, निनाद नांदगावकर, रवींद्र पेणकर जनार्दन नांदगावकर रमेश पेणकर सुरेंद्र पेणकर सर्व महिला मंडळ उपस्थित होत्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार हेमंत नांदगावकर यांनी केले.



# कोयना विस्थापित वावंढळ येथे तुकाराम बीज



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कोयना जांब्रुक वावंढळ येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची तुकाराम बीज मोठ्या उत्साहात आणि आनंदात वारकरी संप्रदाय व ग्रामस्थ यांच्या वतीने साजरी करण्यात आली.

तुकाराम बीज हा संत तुकाराम महाराज यांचा वैकुंठ गमन दिवस मानला जातो आणि महाराष्ट्रात तो साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठ गमनाचा दिवस आहे, असे माननारा एक मतप्रवाह आहे. फाल्गुन वद्य द्वितीयेला तुकारामांचे सदेह वैकुंठ–गमन झाले, असे मानले जाते. आज तुकाराम बीज अर्थात जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री संत तुकाराम महाराज यांचा ३७६वा सदेह वैकुंठ गमन सोहळा वावंढळ येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिरात उत्साहात झाला.

हरिनामाच्या गजरात वारकरी तुकाराम महाराजांच्या भक्तीत आकंठ बुडालेले दिसत होते. वारकरी तुकाराम बीज मोठ्या उत्साहात साजरी करतात.

# श्रीवर्धनच्या किनाऱ्यावर पर्यटकांनी लुटला आनंद

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर, शेखाडी आणि मुख्यतः श्रीवर्धनचे प्रसिद्ध समुद्रकिनारे हे पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षण ठरले आहेत. होळीच्या तीन दिवसीय सुटीत राज्यभरातून पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर हजेरी होती. या सुटीच्या काळात पर्यटक विविध प्रकारे आनंद व्यक्त करत होते.

श्रीवर्धनच्या निळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर आल्यावर, पर्यटक समुद्राच्या गोड पाण्यात आणि वाळूत रममाण झाल्याचे दिसून येत होते. वाळूचा लेप अंगावर पांघरून विविध रंगांची वाळू व समुद्राचे पाणी यांचा आनंद घेत पर्यटक कुटुंबासोबत इथल्या वातावरणात गुडघे टेकून हसत–खेळत होते. खास करून लहान मुलं आणि मुली समुद्राच्या पाण्यात वाळूचा लेप करताना आणि वडलांबरोबर खेळताना आनंदाने उचलून धरले होते.

श्रीवर्धनचा किनारा यासाठी प्रसिद्ध आहे की इथे आलेल्या प्रत्येक पर्यटकाला एक दिव्य अनुभव मिळतो, जो त्यांच्या स्मृतीत कायमचा राहतो. आधुनिकतेला जाऊनही श्रीवर्धनने आपली पारंपारिक आणि नैसर्गिक सुंदरता कायम ठेवली आहे, ज्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणात इथे येऊन आनंद घेत आहेत. श्रीवर्धन हे एक प्राचीन कडे असून हे पर्यटकांचे माहेरघर ठरले आहे. विविध लोक सांस्कृतिक आणि नैसर्गिक विविधतेचा अनुभव घेत, श्रीवर्धनच्या किनाऱ्यावर सुंदर आणि उत्साही वातावरणाचा भाग बनतात.

इथल्या समुद्राच्या शांततेत आणि लहान मोठ्या वाळूच्या ढगांमध्ये पर्यटकांची दिवसभरची मौजमजा आणि विश्रांती पाहणं एक अद्वितीय अनुभव बनला आहे. होळीच्या सणानिमित्त या दिवशी आलेल्या पर्यटकांना श्रीवर्धनच्या किनाऱ्यांवर एक कधी न विसरता येणारा अनुभव मिळत आहे.




# महिलांच्या जीवित, स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी कायद्याचे कवच

*महिलांच्या जीविताचे व स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे, हा व्यापक हेतू डोळ्यासमोर ठेवून महिलांनी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडू नये, समाजामध्ये कौटुंबिक हिंसाचार घडू नये म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ केला आहे. या कायद्याच्या माध्यमातून महिलांच्या जीवित, स्वातंत्र्याचे संरक्षण होण्यासाठी कायद्याचे कवच मिळाले आहे. या कायद्याबाबत थोडक्यात.*

*कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत न्यायदंडाधिकारी हे पीडित महिलेस त्रास देणारे पती किंवा इतर नातेवाईक, Live in Relationship या तत्त्वानुसार एकत्र राहणारा पुरुष साथीदार अथवा त्याचे नातेवाईक त्यांचेकडून शारीरिक, लैंगिक, आर्थिक आणि तोंडी किंवा भावनिक अत्याचाराने पीडित महिलांना निवासाच्या अधिकारासह तिच्या सुरक्षिततेसाठी इतर आदेश काढून त्याद्वारे महिलेचे सांविधानिक अधिकार सुरक्षित करू शकतात. देशभरात दि. २६ ऑक्टोबर २००६ पासून हा कायदा लागू करण्यात आला आहे.*

*कायद्याचा उद्देश : महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देणे, महिलांना घरात सुरक्षितता लाभावी व त्यांना बेघर केले जावू नये. महिलेचा घरात राहण्याचा हक्क अबाधित रहावा. महिलांचे महत्त्व कायमस्वरुपी राहण्यासाठी कठोर कायदेशीर उपाय योजना करणे, महिलांच्या अधिकारांची कडक अंमलबजावणी होणे.*

*कौटुंबिक हिंसाचार म्हणजे : शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषतः अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे किंवा धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा*



*पीडित व्यक्तिचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे किंवा तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंड्याची मागणी करणे. या सर्व गोष्टीचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाईकावर होणे तसेच आर्थिक छळ करणे म्हणजेच महिलेचे स्वतःचे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे.*

*कौटुंबिक हिंसाचारात शारीरिक छळ, लैंगिक अत्याचार, तोंडी आणि भावनिक अत्याचार आणि आर्थिक अत्याचार अशा प्रकारचे अत्याचार समाविष्ट आहेत. यामध्ये पीडितेचा विविध प्रकारे शारीरिक छळ, जबरदस्तीने व अनैसर्गिक पद्धतीने लैंगिक अत्याचार, पीडितेबद्दल अपशब्द, संशय किंवा तोंडी अपमान, अन्य प्रकारची जबरदस्ती किंवा एखाद्या कृतीला मज्जाव तसेच आर्थिक मागणी, तिच्या गरजा पूर्ण न करणे तसेच तिचे हक्क नाकारणे आदि बाबींचा समावेश होतो.*

*तक्रार कोण दाखल करु शकते : १) १८ वर्षांखालील मुलगा किंवा मुलगी २) १८ वर्षांवरील विवाहित मुलगी ३) विवाहित महिला आपल्या पतीसह एकत्र राहणाऱ्या सदस्यावर तक्रार करु शकते ३) मयत झालेल्या पतीची पत्नी आपल्या पतीच्या नातेवाईकांविरोधात तक्रार करु शकते ४) घटस्फोटीत महिला या कायद्याच्या कक्षेत येते ५) सासू सुनेच्या विरोधात तक्रार करू शकते ६) लग्नाशिवाय एकत्र राहणारी महिला आपल्या जोडीदाराविरोधात तक्रार करु शकते ७) हिंसाग्रस्त स्त्रीचे नातेवाईक, शेजारी, हितचिंतक तिच्या वतीने अर्ज करु शकतात ८) हिंसाग्रस्त स्त्री साध्या कागदावर लिखित स्वरुपात पत्र रुपाने, दूरध्वनी करुन किंवा प्रत्यक्ष जाऊन मदत मागू शकतात ९) कायद्याखाली फक्त स्त्रियाच तक्रार दाखल करु शकतात तसेच १८ वर्षाखालील मुले १०) राज्य शासनाने नेमलेल्या संरक्षण अधिकाऱ्याकडे किंवा या कायद्याच्या अंतर्गत स्वतंत्र नोंदणी झालेल्या सेवादायी संस्था, मॅजिस्ट्रेट वा पोलीस अधिकारी यापैकी कोणाकडेही अर्ज करता येतो. या कायद्याखाली कोणत्या गोष्टी मिळतात : हिंसा करणाऱ्या व्यक्तिला ताबडतोब हिंसा थांबवण्याचा आदेश दिला जातो. हिंसा करणाऱ्या व्यक्तिला हिंसाग्रस्त स्त्रीच्या कामाच्या जागी किंवा तिच्या मुलांच्या शाळेत प्रवेश करण्यास बंदी घालू शकतात. हिंसा करणाऱ्या व्यक्तिला दोघांच्याही सामाईक अथवा स्वतंत्र संपत्ती, स्त्रीधन, बँक अकाऊंटस वापरण्याची बंदी केली जाते. हिंसाग्रस्त स्त्री मात्र हे खाते वापरु शकते. एकत्रित निवासात त्रास देणाऱ्या व्यक्तिला राहण्यास मज्जाव किंवा हिंसाग्रस्त स्त्री राहत असलेल्या भागात प्रवेशास बंदी. हिंसा करणाऱ्या व्यक्तिला त्या स्त्रीची स्वतंत्र राहण्याची सोय करण्याचा आदेश. स्त्री राहत असलेले घर विकणे अथवा तेथे राहण्यापासून तिला परावृत्त करण्यास बंदी. हिंसाग्रस्त स्त्रीला खर्चासाठी पैसे, झालेल्या नुकसानीसाठी दवाखाना व औषधोपचारासाठी पैसे संपत्ती हिरावून घेतली असेल तर त्याची भरपाई, तिच्यासाठी व मुलांसाठी पोटगी इ. मिळू शकते. मुलांचा ताबा मिळतो, गरज वाटल्यास मुलांना भेटण्याची परवानगी पुरुषाला नाकारली जाते. हिंसा करणाऱ्याच्या जवळची शस्त्रे काढून घेतली जातात. या कायद्याखाली पीडित महिलेला आवश्यक असल्यास तिला मोफत विधी सेवा, वैद्यकीयसेवा, निवासाची सोय यासारख्या सेवा मोफत मिळतात.*

*कोणत्या न्यायालयात केस करता येते : मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी अथवा मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात दाद मागता येते. तक्रार करणारी व्यक्ती जिथे कायमचे अथवा तात्पुरते वास्तव्यास असेल त्या भागातील न्यायालयाकडे किंवा प्रतिवादी जिथे काम करतो वा राहतो अथवा ज्या भागात हिंसा घडली आहे तो विभाग न्यायालयाच्या अधिकाराखाली असला पाहीजे.*

*केस करण्याची पध्दती : हिंसाग्रस्त स्त्री अथवा संरक्षण अधिकारी किंवा इतर व्यक्ती हिंसाग्रस्त स्त्रीच्या वतीने एका ठराविक फॉर्मवर माहिती भरुन कोर्टात केस दाखल करु शकतात. केस दाखल झाल्याची पावती मिळते आणि तीन दिवसाच्या अवधीत त्या केसची प्रथम सुनावणीची तारीख मिळते. संरक्षण अधिकाऱ्याकडून हिंसेसंदर्भातील अहवाल कोर्ट मागवून घेते, जर गरज असेल अथवा दोघांपैकी एकाची जरी इच्छा असेल तर केस इन कॅमेरा चालू शकते. अत्यंत तातडीची गरज असेल तेव्हा न्यायाधीश एकतर्फी निकाल देऊ शकतात. जेव्हा एखाद्या स्त्रीला जीवघेणी मारहाण किंवा तत्सम इजा झाली असेल तर गरज म्हणून तिच्या संरक्षणासाठी असा निकाल दिला जावू शकतो. अत्यंत महत्वाचा मुद्दा म्हणजे घटस्फोटाची अथवा ४९८–अ ची अथवा इतर केस कोणत्याही दुसऱ्या कोर्टात चालू असली तरी तातडीच्या संरक्षणासाठी या कायद्याखाली संरक्षण मिळू शकते तसेच या कायद्याखाली संरक्षण मागितल्यावर दुसऱ्या फौजदारी कायद्याची मदत स्त्री घेवू शकते. संपूर्ण केस ६० दिवसाच्या आत पूर्ण करुन त्याचा निकाल दिला जातो.*

**(साभार : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**

# डब्ल्यूपीएल विजेत्या मुंबई संघावर पैशांचा वर्षाव



**सहा कोटींचे बक्षीस**

**मुंबई : प्रतिनिधी**

डब्ल्यूपीएल अर्थात महिला प्रीमियर लीग २०२५च्या अंतिम सामन्यात मुंबई इंडियन्स संघाने दिल्ली कॅपिटल्सचा आठ धावांनी पराभव करत थरारक विजय मिळवला आणि दुसऱ्यांदा ते या स्पर्धेचे विजेते ठरले. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने १४९ धावा केल्या. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्स संघ केवळ १४१ धावाच करू शकला. मुंबई इंडियन्सला विजयानंतर चषक आणि सहा कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले आहे.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने दुसरे डब्ल्यूपीएलचे जेतेपद पटकावले आहे. याआधी २०२३मध्येही मुंबई संघ दिल्ली कॅपिटल्सला हरवून चॅम्पियन बनला होता. मुंबईने तेव्हा डब्ल्यूपीएलच्या पहिल्याच सीझनचे विजेतेपद आपल्या नावे केले होते. दुसरीकडे दिल्ली कॅपिटल्सच्या नशिबाने त्यांना यंदाही साथ दिली नाही. दिल्लीचा संघ सलग तीन वर्षे पहिल्या स्थानी येत अंतिम फेरीत पोहचला आहे, पण संघाला पराभवाला सामोर जावे लागले. यंदा अंतिम फेरीत मुंबईने महत्त्वाच्या क्षणी विकेट घेतल्या. याच कारणामुळे दिल्लीच्या संघाला छोट्या लक्ष्याचाही यशस्वी पाठलाग करता आला नाही.

विजेतेपद पटकावल्यानंतर मुंबई इंडियन्स संघाला सहा कोटी बक्षिसाची रक्कम देण्यात आली, तर मुंबईविरूद्ध फायनल गमावल्यानंतर दिल्ली कॅपिटल्स संघाला तीन कोटी बक्षिसाची रक्कम मिळाली आहे. मागच्या वेळीही विजेत्या आणि उपविजेत्याला हिच बक्षीस रक्कम देण्यात आली होती, तर मुंबई इंडियन्सची फलंदाज नॅट स्किव्हर ब्रंटला सीझनमध्ये सर्वाधिक ५२३ धावा केल्याबद्दल ऑरेंज कॅप देण्यात आली. मुंबईचीच फिरकीपटू अमेलिया कर हिला पर्पल कॅप देण्यात आली, जिने १८ विकेट्स घेतल्या.

### विजेत्यांची यादी आणि पारितोषिकाची रक्कम

**विजेते : मुंबई इंडियन्स सहा कोटी रुपये**
**उपविजेते** : दिल्ली कॅपिटल्स तीन कोटी रुपये
**मौल्यवान खेळाडू** : नॅट स्कायव्हर ब्रंट पाच लाख रुपये
**ऑरेंज कॅप** : नॅट स्कायव्हर ब्रंट पाच लाख रुपये
**पर्पल कॅप** : अमेलिया कर पाच लाख रुपये
**उदयोन्मुख खेळाडू** : अमनजोत कौर पाच लाख रुपये
**सर्वोत्तम स्ट्राइक रेट** : शिनेल हेनरी पाच लाख रुपये
**सर्वाधिक षटकार** : अशले गार्डनर पाच लाख रुपये
**सर्वोत्तम झेल** : अनाबेल सदरलँड पाच लाख रुपये
**सर्वाधिक निर्धाव चेंडू (डॉट बॉल्स)** : शबनिम इस्माइल पाच लाख रुपये
**फेअर प्ले अवार्ड** : गुजरात जायंट्स

# श्रीगाव प्रीमियर लीगमध्ये सावी इलेव्हन संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथे ग्रामस्थ मंडळातर्फे होळीनिमित्त श्रीगाव प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेत सावी इलेव्हन संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत गावातील १० संघ सहभागी झाले होते. द्वितीय क्रमांक लक्ष्मी नारायण वॉरियर्स, तृतीय लक्ष्मी नारायण ब्लास्टर्स आणि चतुर्थ क्रमांक ॲड. महेश फायटर्स संघाने मिळवला. सर्व विजयी संघांना कोंबड्या व आकर्षक चषक देण्यात आले. त्याचप्रमाणे स्पर्धेतील उत्कृष्ट गोलंदाज हरेश पाटील, उत्कृष्ट फलंदाज अनिकेत कुथे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक आशितोष पाटील, अंतिम सामन्याचा सामनावीर प्रतिक पाटील, मालिकावीर चेतन पाटील यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



# राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशन, विश्वास सामाजिक संस्था ठाणे यांच्या सहकार्याने ७२व्या वरिष्ठ गट पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे (प.) येथील जे.के. केमिकल कंपनीच्या क्रीडांगणावर १९ ते २३ मार्च या कालावधीत स्पर्धा होईल.

या स्पर्धेची गटवारी तांत्रिक समितीने जाहीर केली आहे. स्पर्धेत पुरुषांमध्ये सर्व संलग्न जिल्हा संघांचा सहभाग असून महिला गटात धाराशिव व हिंगोली जिल्हा संघांचा सहभाग नाही.

**गटवारी खालीलप्रमाणे**

**पुरुष विभाग**

अ गट : पुणे ग्रामीण, बीड, नाशिक शहर; ब गट : अहिल्यानगर, ठाणे ग्रामीण, नांदेड, हिंगोली; क गट : नंदुरबार, ठाणे शहर, रायगड, लातूर; ड गट : पुणे शहर, रत्नागिरी, परभणी, सिंधुदुर्ग; इ गट : मुंबई उपनगर पूर्व, सांगली, धुळे, सोलापूर; फ गट : पिंपरी चिंचवड, मुंबई उपनगर पश्चिम, नाशिक ग्रामीण, सातारा; ग गट : कोल्हापूर, मुंबई शहर पश्चिम, जालना, उस्मानाबाद; ह गट : पालघर, मुंबई शहर पूर्व, जळगाव, औरंगाबाद.

**महिला विभाग**

अ गट : पुणे ग्रामीण, सिंधुदुर्ग, नांदेड; ब गट :रत्नागिरी, कोल्हापूर, अहिल्यानगर; क गट : मुंबई उपनगर पूर्व, सातारा, ठाणे ग्रामीण; ड गट : पिंपरी चिंचवड, नाशिक शहर, परभणी, जालना; इ गट : पुणे शहर, नंदुरबार, रायगड, लातूर; फ गट : पालघर, मुंबई शहर पूर्व, धुळे, बीड; ग गट : ठाणे शहर, मुंबई शहर पश्चिम, नाशिक ग्रामीण, जळगाव; ह गट : सांगली, मुंबई उपनगर पश्चिम, सोलापूर, औरंगाबाद.

# ‘एमआय’च्या कोचने सांगितला डब्ल्यूपीएल फायनलचा ‘टर्निंग पॉइंट’

**मुंबई : प्रतिनिधी**

महिलांची फ्रँचायझी टी-२० स्पर्धा डब्ल्यूपीएलच्या अंतिम सामन्यात मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सला आठ धावांनी पराभूत केले आणि दुसरे विजेतेपद जिंकले. शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या सामन्यात मुंबईने विजय मिळवत ट्रॉफी उंचावली. मुंबई संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर सामनावीर ठरली, तर नॅट स्कायव्हर-ब्रंट मालिकावीर ठरली, पण सामना नेमका कुठे फिरला याबद्दल कोच शार्लेट शार्लेट एडवर्ड्सने सांगितले.

मुंबई इंडियन्सच्या मुख्य प्रशिक्षक शार्लेट एडवर्ड्स म्हणाली, दिल्लीची कर्णधार मेग लॅनिंग अतिशय अनुभवी आहे, तर सलामीवीर शेफाली वर्मा ही तुफानी सुरुवात करून देण्यात निष्णात आहे. या दोघींना लवकर बाद केल्यामुळे खऱ्या अर्थाने सामन्याचा निकाल आमच्या बाजूने फिरला. सुरुवातीच्या विकेट्समुळे मुंबई संघाला डब्ल्यूपीएल विजेतेपद जिंकण्यास मदत झाली. विजयासाठी १५० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली संघाला नऊ विकेट गमावून केवळ १४१ धावा करता आल्या. त्या दोघी टिकल्या असत्या तर निकाल वेगळाही लागू शकला असता.

कोच एडवर्ड्सने ४४ चेंडूत ६६ धावा करणाऱ्या कर्णधार हरमनप्रीत कौरचेही कौतुक केले. हरमन शांत मनाने खेळत होती. ती खूपच अप्रतिम आहे आणि तिला आणखी एक विजेतेपद जिंकायचे होते हे तिने मनात पक्के ठरवले होते. म्हणून तिने तिला शक्य ते सर्व प्रकारचे प्रयत्न केले. ती कर्णधार म्हणूनही उत्तम आहे. युवा खेळाडूंकडून सर्वोत्तम खेळ कसा करवून घ्यायचा याचा तिला चांगला अनुभव आहे. म्हणूनच तिच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सने चांगली कामगिरी केली आहे, असे एडवर्ड्सने सांगितले.

# शूटिंगबॉल स्पर्धेत सिंधुदुर्ग संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मानकुळे येथे ए वन शूटिंगबॉल संघ आयोजित शूटिंगबॉल स्पर्धेत संजय कदम स्पोर्ट्स सिंधुदुर्ग जिल्हा संघाने विजेतेपद पटकाविले.

द्वितीय क्रमांक विद्युत मांडवखार संघ, तृतीय मॉडेल रांजणखार संघ, चतुर्थ ए वन संघ मानकुळे संघ, पाचवा वीर बहिरीदेव संघ, सहावा आर.बी. बॉईज सावर्डे चिपळूण संघ, सातवा आरएमएमएस मुंबई आणि आठवा क्रमांक बीएमसी मुंबई संघाने पटकाविला. विजेत्या संघांना पारितोषिक देण्यात आले. त्याचबरोबर उत्कृष्ट शूटर ऋत्विक नेमण (सिंधुदुर्ग), उत्कृष्ट नेटमन वैभव मोकल (मांडवखार) व उत्कृष्ट डिफेन्सर रिकी नेमण (सिंधुदुर्ग) यांना गौरविण्यात आले.

# सध्या तरी निवृत्तीचा विचार नाही -विराट



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा ‘रनमशिन’ विराट कोहली सध्या ३६ वर्षांचा आहे. तो त्याच्या क्रिकेट कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्यात आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, कारण त्याने टी२० क्रिकेटमधून मागील वर्षीच निवृत्ती घेतली आहे. वनडे आणि कसोटीमध्ये तो अद्यापही सक्रिय आहे, पण तो कधीही क्रिकेटमधून निवृत्त होऊ शकतो असे अंदाज बांधले जातात.

विराट क्रिकेटला कधी रामराम ठोकेल याचे उत्तर सध्या त्यात्याकडे नसले तरीही क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर तो काय करणार आहे, हे मात्र त्याने ठरवलेले आहे. एका कार्यक्रमात त्याने हे उत्तर दिले.

डब्ल्यूपीएल २०२५ची सुरुवात २२ मार्चपासून होणार आहे. यासाठी विराट १५ मार्चला रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूच्या ताफ्यात दाखल झाला. आरसीबीने एका कार्यक्रम आयोजित केला होता, त्यात विराटने निवृत्तीनंतरचा प्लॅन सांगितला. जेव्हा त्याला ‘रिटायरमेंट प्लॅन’ विचारण्यात आला, तेव्हा तो म्हणाला, खरे सांगायचे तर निवृत्तीनंतर मी काय करेन हे मला माहीत नाही. अलिकडेच मी माझ्या एका सहकाऱ्यालाही हाच प्रश्न विचारला आणि त्याच्याकडूनही मला हेच उत्तर मिळाले, पण मला वाटते की मी निवृत्त झालो की मोकळा वेळ खूप मिळेल. त्यात मी कदाचित खूप प्रवास करेन, पण घाबरू नका. मी कोणतीही घोषणा करत नाहीये. सध्यातरी मी क्रिकेट खेळतोय. मला अजूनही क्रिकेट खूप आवडतंय.

चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यान विराटने चांगली कामगिरी केली. पाच सामन्यांमध्ये ५४च्या सरासरीने २१८ धावा केल्या. या काळात त्याच्या बॅटमधून एक शतक व अर्धशतक आले. विराटने पाकिस्तानविरुद्ध नाबाद शतकी खेळी केली, तर उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ८४ धावांची खेळी करत भारताला अंतिम सामना गाठून दिला.

### ...तरच परत खेळायला उतरेन!

स्पोर्ट्स समिटमध्ये अँकर इसा गुहा यांनी विराटची मुलाखत घेतली. तिने विराटला प्रश्न विचारला की तू निवृत्तीतून माघार घेऊ शकतोल का? यावर विराट हसत हसत म्हणाला, भारत ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदकाचा सामना खेळत असेल तरच परत खेळायला उतरेन. मेडल जिंकेन आणि घरी परत जाईन. ही खूप मोठी गोष्ट असणार आहे. ऑलिम्पिक चॅम्पियन बनणे एक कमालीची भावना असेल.

# हॉकीपटू मनदीप सिंग आणि उदिता कौर बांधणार लग्नगाठ!

## जालंधरमध्ये २१ मार्च रोजी विवाहसोहळा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय पुरुष हॉकी संघातील प्रमुख खेळाडू मनदीप सिंग आणि भारतीय महिला हॉकी संघातील खेळाडू उदिता कौर हे विवाह बंधनात अडकणार आहेत. त्यांच्या विवाहाची तारीख निश्चित झाली आहे.



गतवर्षी झालेल्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या भारताच्या हॉकी संघामध्ये मनदीप सिंग याचा समावेश होता, तर उदिता कौर हीसुद्धा भारताच्या महिला हॉकी संघाची सदस्य राहिली आहे. ती २०१८मध्ये आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्य आणि २०२२च्या राष्ट्रकुल स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाची सदस्य होती. याशिवाय २०२१मध्ये टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत चौथे स्थान पटकावणाऱ्या भारतीय संघाचीही ती सदस्य होती.

मनदीप सिंग आणि उदिता कौर यांच्या विवाह सोहळ्याची पत्रिकासुद्धा समोर आली आहे. दोघांच्याही घरी सध्या लगीनघाई सुरू असून त्यांचा विवाह २१ मार्च रोजी पंजाबमधील जालंधर येथील मॉडल टाऊनस्थित श्री गुरद्वारा सिंग सभा येथे होणार आहे, तर २२ मार्च रोजी रिसेप्शन पार्टी दिली जाईल.

# ‘केकेआर’पुढे जेतेपद कायम राखण्याचे आव्हान

**कोलकाता : वृत्तसंस्था**

मागील हंगामात १० वर्षांचा विजेतेपदाचा दुष्काळ संपवून कोलकाता नाइट रायडर्सने आयपीएलची ट्रॉफी तिसऱ्यांदा जिंकली. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली हा संघ चॅम्पियन बनलला, पण या हंगामात ना श्रेयस अय्यर आहे ना मार्गदर्शक गौतम गंभीर. त्यामुळे विजेतेपदाचा मार्ग सोपा नसेल. तरीही आयपीएल २०२५ जिंकण्याच्या दावेदारांमध्ये कोलकाता निश्चितच आहे.

आयपीएलच्या मेगा लिलावात केकेआरने मोठा धोका पत्करला. त्यांनी श्रेयस अय्यरला रिटेन न करताना रिलीज केले, पण लिलावादरम्यान त्याला पुन्हा आपल्या संघात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र तो अयशस्वी ठरला. विशेष म्हणजे, यंदाच्या हंगामात कोलकाताकडे सर्वात स्वस्त कर्णधार आहे. त्यांनी अजिंक्य रहाणेला केवळ १.५ कोटी रुपयांना विकत घेतले आणि कर्णधारपद सोपवले. त्याच्या नेतृत्वक्षमतेवर कोणतीही शंका नाही. त्याचा अनुभव संघासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो.

खरेतर केकेआरसाठी मागील मेगा लिलाव काहीसा निराशाजनक ठरला. संघ ज्या खेळाडूंना आपल्या ताफ्यात जोडू इच्छित होता त्यांना इतर संघांनी मोठी बोली लावली आणि विकत घेतले. परिणामी केकेआर आपल्या अपेक्षित संघाची रचना करू शकले नाहीत. इथे मार्गदर्शक म्हणून गौतम गंभीरची उणीव नक्कीच भासली असणार. तरीही या संघाकडे विजेतेपदाच्या शर्यतीतील प्रमुख दावेदार मानले जात आहे.

कोलकाता नाईट रायडर्सकडे टी-२० क्रिकेटमधील काही मोठी नावे आणि धडाकेबाज फलंदाज आहेत. आंद्रे रसेल, रिंकू सिंह, क्विंटन डी कॉक, आणि रहमानुल्लाह गुरबाज यांसारखे खेळाडू संघात आहेत. हे सर्व खेळाडू मोठे आणि वेगवान फटके मारण्यास सक्षम आहेत. तुफानी फलंदाजांसोबतच संघाकडे संयमी खेळाडूही आहेत, जे परिस्थितीनुसार फलंदाजी करू शकतात. दीर्घकाल टिकून खेळणारे आणि गरजेनुसार गती वाढवू शकणारे फलंदाज या संघाकडे आहेत, त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कोलकाताची फलंदाजी मजबूत राहील.

कर्णधार अजिंक्य रहाणे परिस्थितीनुसार फलंदाजी करण्यात माहिर आहे. उपकर्णधार वेंकटेश अय्यरदेखील मोठ्या इनिंग खेळण्याच्या क्षमतेसाठी ओळखला जातो. मनीष पांडे केकेआरमध्ये परतला असून संघ त्याच्याकडून जुन्या फॉर्ममध्ये खेळण्याची अपेक्षा करेल. मोईन अलीसारखा अष्टपैलू खेळाडू संघात आहे, जो बॅट आणि बॉल दोन्हीने प्रभाव पाडू शकतो. संघाकडे अशा प्रकारची फलंदाजी आहे जी कोणत्याही परिस्थितीत सामना जिंकू शकते, आणि हीच संघाची सर्वात मोठी ताकद आहे.

मजबूत फिरकी आक्रमण हीदेखील केकेआरची जमेची बाजू आहे. संघातील नावजलेले फिरकीपटू कोणत्याही खेळपट्टीवर प्रभावी ठरू शकतात. सुनील नरेन हा अनुभवी फिरकीपटू आहे, ज्याचा सामना करणे कोणत्याही फलंदाजासाठी सोपे नाही. वरुण चक्रवर्तीने टीम इंडियाकडून खेळताना प्रभावी प्रदर्शन केले आहे. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास उंचावला आहे. मयंक मारकंडे आणि मोईन अलीदेखील फिरकी आक्रमणात योगदान देऊ शकतात.

केकेआरला वेगवान गोलंदाजीतील फायर पॉवरची कमतरता जाणवणार आहे, कारण गेल्या हंगामात मिचेल स्टार्कसारखा गोलंदाज होताम जो या हंगामात नाही. तथापि, हर्षित राणा चांगला खेळ करू शकतो. एन्रिक नोर्किया त्याच्या लयीत नसल्याचे दिसत आहे. गेल्या काही हंगामात उमरान मलिकची जादूही ओसरली आहे. गोलंदाजीत आंद्रे रसेलही फारसा प्रभाव टाकू शकेल असे वाटत आहे. त्यामुळे वेगवान माऱ्याकडे संघाला लक्ष्य द्यावे लागेल.

### कामगिरीत सातत्य आवश्यक

केकेआरकडे सामना फिरवण्याची क्षमता असलेल्या खेळाडूंची कमतरता नाही, मात्र त्यांची कामगिरी सातत्याने चांगली राहिली तरच ते पुन्हा आयपीएल जिंकू शकतील तसेच नवीन कर्णधार आणि काही बदलांमुळे या संघासाठी जेतेपद राखणे अवघड असेल. संघाचे प्रशिक्षक चंद्रकांत पंडित तसेच उर्वरित स्टाफला रणनीती आखावी लागेल. संघाला पुढे कसे न्यायचे हे ठरवावे लागेल. नवीन कर्णधाराच्या नेतृत्वाखाली संघाला एकत्र ठेवणे आणि प्रत्येक खेळाडूने त्याला समजून घेणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

### संतुलित संघ

केकेआरने एक संतुलित संघ तयार केला आहे, ज्यात अनुभवी आणि युवा खेळाडूंचा योग्य समतोल आहे. संघात असे काही खेळाडू आहेत ज्यांना ते भविष्यासाठी तयार करू शकतात. रहाणे संघाचा कर्णधार आहे, पण त्याची कारकीर्द फार मोठी नाही हे सर्वांना माहिती आहे. अशा परिस्थितीत संघ त्याच्या नेतृत्वाखाली एक नवीन लीडर तयार करू शकतो, जो निश्चितच वेंकटेश अय्यर असू शकतो. त्याचप्रमाणे संघ रमणदीप सिंग आणि हर्षित राणा यांना दीर्घकालीन खेळाडू म्हणून विकसित करू शकतो. रमणदीपची गेल्या हंगामातील कामगिरी लक्षवेधी ठरली होती, तर यंदाच्या देशांतर्गत हंगामात त्याने प्रभावी प्रदर्शन केले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com